https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -२४५ गुरुवार,दि.०८ मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-245 | Thursday, Dt.08 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## आयकॉन पॅराडाईज ज्यूनियर कॉलेजचा निकाल १०० टक्के....!

प्रतिनिधी @ पैठण

येथील विशाल बहुतेशीय प्रतिष्ठान संचलित आयकॉन पॅराडाईज ज्यूनियर कॉलेज पैठणचा निकाल याही वर्षी १००% लागला असून गौरी गणेश लाहोटी ही विज्ञान शाखेची विद्यार्थिनी ९०% गुण घेऊन प्रथम आलेली आहे. विज्ञान शाखेत एकूण ५० विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली होती. या पैकी ३८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह (७५% पेक्षा जास्त गुण) उत्तीर्ण झाले आहेत तर ११ विद्यार्थी प्रथम श्रेणीत आणि १ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे. वाणिज्य शाखेचा निकालही शंभर टक्के लागला असून सर्वच विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.विज्ञान शाखेत ८० टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी खालील प्रमाणे : गौरी लाहोटी (५४०) ९०% शुभम खरगे (५३४) ८९% आदित्य गायकवाड (५२९)

# बीडमध्ये जलसंकट

## सहनशीलतेचा अंत पाहू नका, टेस्टिंग करतानाच पाइपलाइन पुन्हा फुटली, पोलिसांच्या समजुतीनंतर युवक टाकीवरून उतरले



बीड /प्रतिनिधी

शहरातील अनेक भागांमध्ये गेल्या ३२दिवसांपासून नळाला पाणी आलेले नाही.पाइपलाइन दुरुस्तीसाठी १४ दिवसांचाशटडाऊन घेण्यात आला होता. मात्र, २२व्या दिवशीही काम सुरूच आहे. मंगळवारीदुपारी २ वाजता कमी दाबाने टेस्टिंग सुरूअसताना देवडी येथे पाइपलाइन लिकेजझाली. त्यामुळे पुन्हा पाइपलाइन कोरडीकरून दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आलेआहे. काम रात्रीतून पूर्ण झाले, तर गुरुवारीसकाळी कमी आणि सायंकाळी उच्चदाबाने टेस्टिंग होणार आहे. त्यानंतर किमानदोन दिवसांनी टप्प्याटप्प्याने पाणीपुरवठासुरू होईल. ज्या भागात शटडाऊनमुळेपाणी बंद झाले होते, तिथून पुरवठा सुरूहोणार आहे. त्यामुळे शेवटच्या भागातपाणी पोहोचायला आणखी ८ ते १२ दिवसलागणार आहेत.

उद्या अजित पवारगटाचा हंडा मोर्चा

शुक्रवारी ( ९ मे) सकाळी११ वाजता बीड शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकरपुतळा ते पालिका कार्यालयअसा हंडा मोर्चा निघणारआहे. पालकमंत्री अजितपवार गटाचे शेख निजाम,भागवत तावरे यांच्यानेतृत्वात मोर्चा होणार आहे.

निवडणुकीचा बिगूल वाजताच पुढारी जागेझाले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेबठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनीपालकमंत्री अजित पवार आणिनगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीकाकेली. बीडच्या गंभीर पाणी प्रश्नावर दोघांनीबीडला येऊन बैठक घ्यायला हवी होती. मात्र तेफोनवरून सूचना देत आहेत. हे उंटावरूनशेळ्या हाकण्यासारखे असल्याचे गिराम यांनीम्हटले.

सध्या उन्हाळा असल्याने बीडकर पाण्यासाठीटाहो फोडत आहेत. पालिकेचे अधिकारी मात्रवर्षभर निष्क्रिय राहिले. कुजलेल्यापाइपलाइनसाठी २०१७ मध्ये निधी मिळालाहोता. तरीही दुरुस्ती रखडली. उन्हाळ्यात १६एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत शटडाऊनघेण्यात आला. पण, ८ मे उजाडला तरी कामपूर्ण झालेले नाही. पाइपलाइन दुरुस्त केव्हाहोईल, याचे उत्तर पालिकेकडे नाही. नागरिकविचारतात तेव्हा 'दुरुस्तीनंतर पाणी येईल' असेसांगितले जाते. उच्च दाबाने टेस्टिंगनंतर कुठेलिकेज आहे का, हे तपासले जाणार आहे.अडथळा न आल्यास दोन दिवसांत काम पूर्णहोईल. गेल्या उन्हाळ्यातही बीडकरांनापाण्यासाठी हाल सहन करावे लागले. यंदाहीतेच सुरू आहे.

पाण्यासाठी तरुण आक्रमक

पाणीटंचाईमुळे पालव चौक परिसरातीलयुवकांनी मंगळवारी रात्री १० वाजतापाण्याच्या टाकीवर चढून आंदोलनकेले. पंकज धांडे, अविनाश कांबळे,अक्षय दळवी यांच्यासह काही युवकटाकीवर गेले. रात्री ११ वाजता बिंदुसराधरणाचे पाणी टाकीत आले.पाणीपुरवठा अभियंता प्रमोद आणिशिवाजीनगर पोलिसांनी समजूतकाढल्यानंतर युवक रात्री १२ वाजताखाली उतरले.




## बीड शहराच्या संदर्भात आ.क्षीरसगरांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक

बीड (प्रतिनिधी)

पावसाळ्याच्या पूर्वी शहरातील नालेसफाई, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन करणे तसेच बीड नगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी चतुर्थ कर आकारणी (टॅक्स रिव्हीजन) करण्यासाठी सुव्यवस्थित करणे तसेच बीड शहरातील नगर रोडवर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुना नगर नाका यांमध्ये रस्ता क्रॉसिंग अशा विविध प्रश्नांच्या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.७) रोजी जिल्हाधिकारी यांच्यासमवेत बैठक घेतली.

बीड शहरात पावसाळ्याच्या अगोदर नालेसफाई, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी कामे होणे गरजेचे आहे. जेणेकरून नागरिकांचे आरोग्य आणि शहरातील स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होणार नाही. यासोबतच बीड नगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी चतुर्थ कर आकारणी (टॅक्स रिव्हीजन) होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याबाबत सुव्यवस्थित नियोजन करून प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. यासोबतच नगर रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुना नगर नाका यादरम्यान सर्व शासकीय कार्यालये आहेत. परंतु याठिकाणी एकही रस्ता क्रॉसिंग नाही त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. बीड शहाराच्या अनुषंगाने या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. दरम्यान पावासाळ्यापूर्वी स्वच्छतेची कामे करण्यासाठी योग्य नियोजन करण्याबाबत तसेच नगरपालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी चतुर्थ कर आकारणी

(टॅक्स रिव्हीजन) च्या संदर्भात आराखडा तयार करून त्याचेही सुव्यवस्थित नियोजन करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी नगरपालिका प्रशासनाला सूचित केले. यासोबतच नगर रोडवर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक रस्ता क्रॉसिंग करण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. या बैठकीस आ.संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, माजी आ.सय्यद सलीम व नगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी केले नलबे कुटुंबियांचे सांत्वन

### लोकनेते गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने आर्थिक मदत सुपूर्द

प्रतिनिधी @ वडवणी

वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील शेतकरी अभिमान पांडुरंग नलबे या तरुणाचे अंगावर वीज पडून निधन पावल्याची दूर्देवी घटना घडली असून याची माहिती समजताच बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी काल दि.७ बुधवार रोजी नलबे कुटुंबियांची भेट घेवून सांत्वन केले. तसेच या कुटुंबांच्या चार मुली व एक मुलगा यांच्या इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतची संपूर्ण शैक्षणिक खर्चाची जबाबदारी प्रितमताई यांच्या सांगण्यावरुन युवा नेते संजय भाऊ आंधळे यांनी घेतली असून तसेच लोकनेते गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने आर्थिक मदत कुटुंबीयांकडे सुपूर्द करण्यात आली. तसेच या कुटुंबांला संपूर्ण शासकीय योजना मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन डॉ.प्रितमताई मुंडे यांनी यावेळी दिले.



याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील तरुण शेतकरी अभिमान पांडुरंग नलबे वय ३५ वर्ष यांचे ते सोमवारी वादळी वारे व अवकाळी पाऊसात शेतात झाडाखाली थांबलेले असतांना अंगावर वीज पडून जागीच मरण पावल्याची दूर्देवी घटना घडली आहे. यामध्ये त्यांना फक्त एक एकर जमिन असून घरातील कमविता व कर्ता व्यक्ती गेल्याने या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून यामध्ये पत्नी, लहान तीन मुली, एक मुलगा हे पोरके झाले आहेत. त्यांना आजमित्तीस सर्वोतोपरी मदत करण्याची आवश्यकता असून याची माहिती कळतांच बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी काल दि.७ मे २०२५ बुधवार रोजी दुपारी वडवणी तालुक्यातील ढोरवाडी या गावी जावून दुःखांकीत नलबे कुटुंबियांची भेट घेवून त्यांची पत्नी, तीन मुली व एक मुलगा व कुटुंबीय यांचे सांत्वन करुन धीर दिला. व यावेळी या चारही मुलांची संपूर्ण शैक्षणिक खर्चाची जबाबदारी प्रितमताई यांच्या सांगण्यावरुन युवा नेते संजय भाऊ आंधळे यांनी स्विकारली आहे. तसेच लोकनेते गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने आर्थिक मदत यावेळी देण्यात आली. तसेच या कुटुंबाला तात्काळ घरकूल योजना देण्याचे उपस्थित गटविकास अधिकारी यांना सूचित केले. तसेच नैसर्गिक आपत्तीच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्यात यावी असे उपस्थित महसूल विभागाचे तलाठी यांना सांगितले. याच बरोबर या कुटुंबाला सर्व शासकीय योजना मिळवून देण्यासाठी स्वतः पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले व या कुटुंबाला सर्वोतोपरी मदत करणार, उघड्यावर अजिबात पडून देणार नाही असे सांगितले. यावेळी युवा नेते संजय भाऊ आंधळे, भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव दादा रेडे, बन्सीभाऊ मुंडे उपनगराध्यक्ष, अंकुश वारे माजी उपनराध्यक्ष, महादेव सावंत भाजपा तालुका उपाध्यक्ष, मयुर भैय्या आंधळे सरपंच, दिनेश नाईकवाडे सरपंच, नाना शिंदे, देविदास चव्हाण, बद्रिनाथ व्हरकटे, कल्याण थोरात, गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, मुन्ना फड, मनोज पाटील तालुकाध्यक्ष बीड ग्रामीण यांसह ढोरवाडी येथील ग्रामस्थ, पुरुष, महिला, पत्रकार उपस्थित होते.

प्रितमताईंच्या सूचनेनुसार संजय आंधळेंनी स्विकारले मुलांचे शैक्षणिक पालकत्व..

यावेळी या सांत्वनपर भेटीदरम्यान माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी दिवंगत अभिमान नलबे यांच्या तीन मुली व एक मुलगा अशा चारही मुलांचे इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे शैक्षणिक पालकत्व स्विकारण्याची जबाबदारी युवा नेते संजय भाऊ आंधळे यांना दिल्यानंतर संजय आंधळे यांनीही तात्काळ त्या चारही मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्विकारले असून यामुळे या चिमुकल्यांच्या शिक्षणामध्ये कसलाही खंड न पडता त्यांना आवश्यक त्या सर्व शैक्षणिक गरजा पुरविण्याचे अभीवचन यावेळी संजय आंधळे यांनी दिले.

## पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकरी पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार व दडपशाहीमुळे आक्रमक

### जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक यांना लेखी तक्रार :- डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी @ पाटोदा

पाटोदा तालुक्यात पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार, शेतकऱ्यांना मावेजा न देणे, एकसारखा मावेजा न देणे, धनादेश न वटणे आणि पुन्हा वरून पोलिस प्रशासनाच्या मदतीने दडपशाही करणे असे प्रकार सर्रास सुरू असुन आज दि.७ बुधवार रोजी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकरी पवनचक्की कंपन्यांच्या विरोधात आक्रमक झाले होते. शेतकऱ्यांचा विरोध झुगारून पोलिस बंदोबस्तात शेतकऱ्यांच्या शेतातुन विद्युत तारा ओढणा-या पवनचक्की कंपन्यांना विरोध केल्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण होते. पाटोदा पोलिस स्टेशन पोलिस उपनिरीक्षक आदिनाथ भडके व पोलीस प्रशासन आणि अतिरीक्त कुमक व दोन पोलिसांच्या व्हॅन घटनास्थळी दाखल होत्या. तारा ओढण्यास विरोध करणाऱ्या व जबरदस्तीने तारा ओढल्यास जीवाचे बरं वाईट करून घेईन असं म्हणणा-या अक्षय बाळासाहेब मुळे या शेतकरी पुत्राला पोलिसांनी पकडुन व्हॅन मध्ये टाकुन पाटोदा पोलिस स्टेशनला नेण्यात आले. पाचेगावच्या पिडीत शेतकर्यांनी लेखी निवेदनाद्वारे



जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक बीड तसेच उपविभागीय अधिकारी पाटोदा, तहसीलदार पाटोदा आणि पोलिस स्टेशन पाटोदा यांना मावेजा देईपर्यंत तारा ओढण्याचे काम बंद ठेवून आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी केली आहे. निवेदनावर विकास कृष्णाथ गिरे, बाळासाहेब भानुदास मुळे ,

सतिश बाबुराव गिरे ,विष्णू राम सावंत ,रहिम मक्तुम शेख , मनोज विजय गिरे , विष्णु चांगदेव गिरे , प्रकाश महादेव सावंत,काकासाहेब मारोती गिरे ,हनुमंत राम सावंत आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांची कैफियत ऐकुन सखोल चौकशी करून त्यांना न्याय द्यावा. पवनचक्की कंपन्यांकडुन सशुल्क पोलिस संरक्षण घेऊन शेतकऱ्यांवर दडपशाही करण्याच्या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत असुन यामुळे पोलिस प्रशासन व जिल्हा प्रशासनाची जनसामान्यात प्रतिमा मलिन होत असून शेतक-यांना कोणीही वाली नसल्याने प्रशासनाने शेतकऱ्यांचे तारणहार व्हावे अशी अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# खरीप हंगामासाठी,दर्जेदार बियाणे आणि योग्य दरात खते उपलब्ध करून द्या;पीक कर्ज वेळेत वितरित करा

## आ.सुरेश धस यांच्या खरीप आढावा बैठकीत सूचना

प्रतिनिधी @ आष्टी

यावर्षी समाधानकारक पाऊस पडणार असल्याचे सांगितले जात असल्यामुळे पुरेसा पाऊस झाल्यानंतर शेतकऱ्यांना पेरणीसाठी दर्जेदार बी बियाणे आणि योग्य दरात खते उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने नियमांचे काटेकोर पालन करावे. बँकांनी शेतकऱ्यांना पीक कर्ज वेळेत वाटप करावे. कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी सूक्ष्म नियोजन करावे. शेतकऱ्यांपर्यंतच्या बांधावर पोहचून त्यांना मार्गदर्शन करावे अशा सूचना आमदार सुरेश धस यांनी तालुकास्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीमध्ये सर्व खातेप्रमुखांना दिल्या आहेत.

या आढावा बैठकीसाठी पाटोदा उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, आष्टी तहसीलदार वैशाली पाटील, कृषी अधिकारी सुभाष साळवे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, आष्टी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, पाटोदा तालुका कृषी अधिकारी राजेंद्र नेटके, शिरूर कृषी अधिकारी पवार, आष्टीचे नगराध्यक्ष जिया बेग उपस्थित होते.

पुढे बोलताना धस म्हणाले की, मतदार संघातील आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार ) या तीनही तालुक्यांसाठी बियाणे उपलब्ध व्हावेत म्हणून आष्टी बफर स्टॉक (रॅक पॉईट) करण्यासाठी आपण वरिष्ठांशी चर्चा करणार असून, खरीप हंगामात शेतकऱ्यांना वेळेत व माफक दरात दर्जेदार खते, बी - बियाणे मिळतील याची खात्री करा, यासाठी वेळोवेळी निविष्ठांची तपासणी करा असे सांगत आ. सुरेश धस म्हणाले ऊस, ज्वारी, सोयाबीन, भुईमूग व कडधान्य पिकांसाठी खरीप हंगामात पाऊस चांगला होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे; परंतु पाऊस कमी झाला तरीही उत्पादन वाढीसाठी सूक्ष्म नियोजन करा. मतदारसंघातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक ते सहकार्य करा. २०२५ - २६ मध्ये पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करा. मतदार संघातील शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व योजनांची माहिती देऊन शासकीय योजनांचा लाभ, विमा सुरक्षा मिळवून द्या. तसेच पीक कर्ज मुदतीत वितरित करा. स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेसह शेतकऱ्यांशी संबंधित सर्व प्रलंबित प्रकरणे तत्काळ निकाली काढा. शेतकऱ्यांना विम्याची रक्कम व



कर्जवाटप मुदतीत करा. शेतकऱ्यांना मशागत व पेरणी पूर्व मार्गदर्शन करा. क्षारपड जमिनीत सुधारणा होण्यासाठी तसेच या जमिनीची उपयुक्तता वाढविण्यासाठी उपाययोजनांवर भर द्या. मतदारसंघातील रेशीम उत्पादकता वाढविण्यासाठी सूक्ष्म नियोजन करून त्यानुसार अंमलबजावणी करा. आष्टी पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील लागवडी लायक हेक्टरी क्षेत्र आणि त्या क्षेत्रामध्ये पिकांनुसार लागवड योग्य क्षेत्र व त्या प्रमाणात उपलब्ध होणारे खत व बियाणे यांच्या बाबतचा तुटवडा तसेच आष्टी पाटोदा व शिरूर तालुक्यासाठी खत व बियाणांसाठी महामंडळाचा असणारा रॅक पॉइंट हा परळी या ठिकाणी असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर आष्टी पाटोदा व शिरूर तालुक्याला खतांचा दरवर्षी तुटवडा जाणवतो त्यामुळे याबाबत संबंधितांशी बोलून आष्टी मतदार संघासाठी आष्टी येथे नवीन रॅक पॉईंट मिळवण्यासाठी योग्य पाठपुरावा करण्याबाबत चर्चा झाली आहे तसेच बीज प्रक्रिये बाबत शेतकऱ्यांना कृषी सहाय्यक अधिकारी यांच्याकडून योग्य ती माहिती व त्यासाठी लागणारे औषधे उपलब्ध होत नाहीत व कृषी सहाय्यकांकडून प्रात्यक्षिक दिले न गेल्यामुळे अनेक शेतकरी कुठलीही बीज प्रक्रिया न करता आपल्या बियाणांची शेतामध्ये पेरणी अथवा लावणी करतात तसेच शिरूर कासार तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावरती तूर आणि कापूस हे प्रमुख पीक घेतले जाते परंतु एकाच कंपनीचे बियाणे कृषी विक्रेत्यांच्याकडून वारंवार शेतकऱ्यांना दिले जाते, त्यामुळे कापूस व तूर या पिकाची दरवर्षी मिळणारे सरासरी यामध्ये तफावत येत आहे. त्यामुळे कृषी विक्रेत्यांना विनंती आहे की वेगवेगळ्या प्रजातीच्या बियाणांची आपण शेतकऱ्यांना माहिती देऊन ते लागवड करण्यासाठी व पेरणीसाठी प्रोत्साहित करावे.

आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणावर खते व बियाणांचे लिंकिंग स्वरूपात विक्री सुरू आहे. उदाहरणार्थ ज्या शेतकऱ्यांना युरिया घ्यायचा आहे त्या शेतकऱ्यांना नॅनो युरियाची बॅग घेणेबाबत सक्ती होत आहे. एका खताच्या कंपनीबरोबर दुसऱ्या कंपनीचे खत घेणे बंधनकारक केले जात आहे ही बाब गंभीर आहे. त्यामुळे सर्व कृषी सेवा केंद्र यांना विनंती आहे की शेतकऱ्यांची अडवणूक करू नका. यासह खरीप हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांच्या बाबतीत पडणारी कीटकनाशके रोगराई व त्याबाबत फवारणी करण्यासंदर्भातील बायो ऑरगॅनिक औषधे याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जावा रासायनिक औषधांचा व केमिकल युक्त औषध व फवारणी साठी लागणाऱ्या पावडर ह्या कमी प्रमाणात वापरल्या जाव्यात. यासाठी कृषी विभाग व त्या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी शेतकऱ्यांना जागृत करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी बियाणे उगवणक्षमता व बीजप्रक्रिया याबाबत प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. शेतीमधील उत्पादन खर्च कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी घरचं बियाणे उगवण क्षमता तपासून पेरणीसाठी वापरावे तसेच बियाण्याला रासायनिक किंवा जैविक कीटकनाशके, बुरशीनाशके व जैविक घटकांची बीजप्रक्रिया केल्याने उगवण क्षमता चांगली होते तसेच रोपावस्थेतील कीड व रोगांचे प्रमाण कमी होते. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी असे आवाहन मा. आ. सुरेश धस यांनी शेवटी केले.

कृषी सहाय्यक यांनी बांधावर जावे

शेतकऱ्यांना कृषी योजनेची माहिती देण्यासाठी दुपारी ११ वा. नाही तर सकाळी ७ - ८ वा. जाऊन माहिती देणे गरजेचे असताना हे कृषी सहाय्यक वेळेचे बंधन ठेवत नाहीत. अशा कृषी सहाय्यक, कृषी मंडळ अधिकारी यांच्यावर तालुका कृषी अधिकारी यांनी ठेवणे गरजेचे आहे. पण आता यावर जर कुणाचा वचक राहिलेला नाही. परंतु जर कुणी कामात हलगर्जीपणा केला तर कुणाचीही गय केली जाणार नाही. कृषी सहाय्यक यांनी बांधावरच जावे अशा सूचना आ. सुरेश धस यांनी दिल्या.

# आमदार बाबुराव पाटील कदम कोहळीकर यांच्या प्रयत्नांना मुळेच आगारामध्ये सहा नवीन बसेस



प्रतिनिधी @ हादगांव

आमदार बाबुराव पाटील कदम कोहळीकर यांच्या प्रयत्नांना मोठे यश आले असून हदगाव आगारामध्ये पहिल्याच टप्यात सहा नवीन बसेस दाखल झाल्या असून ५ मे रोजी त्यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. त्यामुळे महिला नागरिक वयोवृद्ध.अपंग,

विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. हदगाव आगारामध्ये अनेक दिवसांपासून अपुऱ्या बसेस जुन्या मोडकळीस आलेल्या बसेस जीर्ण बसेस यामुळे नागरिकांची मोठी तारांबळ उडत होती यामध्ये विद्यार्थी अपंग वयोवृद्ध महिला पुरुष यांना नाहक त्रास सहन करावा लागत होता बस वेळेवर येत नसल्यामुळे नागरिकांतुन ओरड होत होती या गंभीर बाबीकडे हदगाव हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबुराव पाटील कोहळीकर यांनी स्वता लक्ष देऊन महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांची समक्ष भेट घेऊन बसप्रवास करतांना जनतेचे होणारे त्रास परिवहन मंत्री यांच्या समोर ठेवून वाढीव बसेस साठी निवेदन दिले होते नुसते निवेदनच देऊन नाही तर त्या निवेदनांना त्यांनी पाठपुरावा करून अखेर हदगाव आगार मध्ये सहा नवीन बसेस उपलब्ध करून दिल्या व आज पाच मे रोजी त्यांचे लोकार्पण सुद्धा केले व जनतेच्या सोयीसाठी त्यांनी नवीन गाड्या उपलब्ध करून दिल्या यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, अनिल पाटील बाभळीकर, बबन माळुदे, आगार प्रमुख धर्माधिकारी बबन कदम बाळासाहेब कदम राजू तावडे, संदीप आढाव संभाराव लांडगे. बंडू तावडे. इत्यादी उपस्थित होते.

# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या केज तालुकाध्यक्षपदी दिनकर जाधव यांची निवड



प्रतिनिधी @ केज

केज तालुक्यातील सारणी (सांगवी) येथील रहिवासी असलेले तथा गेल्या दीड दशकाहून अधिक काळ पत्रकार क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करत सामाजिक प्रश्न सरकार दरबारी मांडणारे पत्रकार दिनकर किसनराव जाधव यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या केज शाखेच्या तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण असणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.गेल्या दीड दशका पासून त्यांच्या पत्रकारितेमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अधिक अधिक आवाज उठवण्याचे काम त्यांनी केले आहे.तसेच अनेक सामाजिक प्रश्न त्यांनी शासन दरबारी मांडत त्याचा पाठपुरावा केलेला आहे.त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी,राज्य अध्यक्ष विष्णू कंकाळ यांच्या आदेशाने राज्य सचिव दत्तात्रय मुजमुले यांनी दिनकर किसन राव जाधव यांची केज तालुका अध्यक्षपदी निवड केली आहे.या निवडीबद्दल त्यांचे राजकीय,सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी जखमी, बीड जिल्हा रुग्णालयात उपचारात हलगर्जीपणा तर वनविभाग अनभिज्ञ

## बीड तालुक्यातील पिंपरनई येथील शेतकरी नानासाहेब हजारेंची व्यथा :- डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी । लिंबागणेश

वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास २० लाखांपर्यंत मदत दिली जाते.१० लाख रूपये धनादेशाद्वारे तर १० लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेत असलेल्या दरमहा व्याज देणा-या संयुक्त खात्यांमध्ये जमा केले जातात. तसेच अपंग झाल्यास ५ लाख रुपये, व्यक्ती गंभीर जखमी झाल्यास १ लाख २५ हजार रुपये व किरकोळ जखमी झाल्यास २० हजार रुपये औषधोपचारासाठी खर्च दिला जातो. मात्र बहुतेक वेळा याची माहिती वनविभागाला दिली जात नसल्याने जखमी मदतीपासून वंचित राहिल्याचे दिसून येते कारण मदतीसाठी हल्ला झाल्यानंतर ४८ तासाच्या आत वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना कळवुन ३ दिवसांच्या आत पंचनामा होणे अपेक्षित असते तरच लाभास संबंधित पात्र ठरतो. नानासाहेब श्रीरंग हजारे यांच्या बाबतीत हल्ल्याची घटना उलटून १५ दिवस झाल्याने सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी बीड वनपरीक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांच्याशी संवाद साधत बीड जिल्हा रुग्णालयातील कागदपत्रे तपासून सहानुभूती पुर्वक विचार करून मदत द्यावी अशी विनंती केल्यानंतर सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन अशोक काकडे यांनी दिले आहे.



दि.२० एप्रिल रोजी रात्री १० वाजता बीड तालुक्यातील पिंपरी गावातील शेतकरी नानासाहेब श्रीरंग हजारे हे तळ्याशेजारी असलेल्या शेतातील वैरणीच्या कडब्या शेजारी झोपलेल्या अवस्थेत असताना तळ्यावर पाणी पिण्यासाठी आलेल्या रानडुकरांनी हल्ला केला.त्यात त्यांचा जबडा फाटला असुन पायाला दुखापत झाली. त्यानंतर त्यांनी औषधोपचारासाठी लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्र गाठले. त्याठिकाणी उपचाराची सोय नसल्याने त्यांना रूग्णवाहिकेतुन नेकनुर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवले. रात्री १२ वाजता नेकनुर ग्रामीण रुग्णालयातुन उपचाराची सोय नसल्याने बीडच्या जिल्हा रुग्णालयात पाठवले त्याठिकाणी केवळ एक इंजेक्शन दिले आणि एकदाच पट्टी केली. नानासाहेब हजारे यांनी उपचारासाठी वैद्यकीय अधिकारी यांनी हलगर्जीपणा केल्याचा आरोप केला असुन सर्वसामान्य लोकांकडे जिल्हा रुग्णालयात लक्ष देत नसल्याची खंतही डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलून दाखवली.बीड जिल्ह्यात मागच्या वर्षभरात शेतकरी व जनावरांवर वन्यप्राण्यांनी हल्ला केल्याच्या घटना घडलेल्या आहेत. परंतु याची माहिती विभागीय वन कार्यालयाकडे उपलब्ध नसून ही माहिती रेंज कार्यालयाकडे असल्याचे तेथील कर्मचारी सांगतात. यावरून वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत किंवा जखमींना मदत दिली नसल्याचे दिसत आहे. बीड शहरातील विभागीय वन अधिकारी हे जिल्ह्याचे वनविभागाचे मुख्य कार्यालय असल्याने त्यांच्याकडे सर्व माहिती उपलब्ध असायला हवी. मात्र महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जखमींना मदत मिळण्यासाठी ४८ तासांच्या आत कळवुन ३ दिवसांच्या आत पंचनामा होणे बंधनकारक असुन तरच लाभ मिळतो.मात्र याविषयी शेतकऱ्यांना माहिती नसल्याने बहुतेक जखमी शासकीय मदतीपासून वंचित रहात असुन अटी मध्ये शिथिलता आणावी अशी मागणी

# वादळी वाऱ्यामुळे तालुक्यातील अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे नुकसान



प्रतिनिधी । लोहा

तालुक्यातील निळा येथील शेतकऱ्याच्या शेतातील सौर पॅनेलचे नुकसान झाले . वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानाची भरपाई देण्याची ... मागणी सोमवारी सायंकाळच्या सुमारास नांदेड जिल्ह्याच्या विविध भागांमध्ये अचानक वादळी वाऱ्याची सुरुवात झाली, शेतकरी शेतात असता भयानक परीस्थिती निर्माण झाली करावे कुठे जावे ,आशि परीस्थिती निर्माण झाली शेती कुंपण ,काट्याकुट्याचे फास, घरावरील पत्रे, शेतीमध्ये असलेल्या झोपडी वरील छप्पर हवेत उडत होते यातशेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.

सुटलेल्या वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले . बरीचशी झाडे भुई सपाट झाल्याचे दिसून येत आहे प्रचंड वेगाने असलेल्या वादळी वाऱ्यामुळे निळा ता.लोहा येथील भगवानराव इंगळे , शोभाबाई भगवानराव इंगळे यांच्या सह अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील सौर पॅनेलचे नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानाची भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांमधून जोर धरत आहे.

# बुखारी उर्दू उच्च माध्यमिक विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

## विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के व कला शाखेचा ८८.३३ टक्के

प्रतिनिधी । माजलगांव

माजलगाव येथील बुखारी उच्च माध्यमिक विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली असून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी २०२५ मध्ये उच्च माध्यमिक मंडळा मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून त्यामध्ये प्रथम क्रमांकावर शेख शाहिस्ता अझीम ८९.६७ टक्के व द्वितीय क्रमांक सय्यद आमेरा राजू ८१.५० टक्के व तसेच मणियार खातीजतुल कुबरा एजाज़ अह्मद हिने ७२ टक्के पटकावून तृतीया स्थान मिळवले आहे व तसेच कला शाखेचा ८८.३३ टक्के निकाल लागला असून त्यामध्ये काझी शीफा अतहर हिने ८५.६७ टक्के गुण मिळवून प्रथम स्थान पटकावले आहे व शेख झीनत अख्तर या विद्यार्थीनीने द्वितीय स्थान मिळवले आहे तसेच शेख समरीन इसहाक हिने ७४.६७ टक्के गुण घेऊन तृतीय स्थान मिळवले आहे उत्तीर्ण विद्यार्थिनींचे बुखारी उर्दू एजूकेश्नल संस्थेचे सचिव खुर्शिद नाईक साहेब व संस्थेचे अध्यक्ष अझहर नाईक साहेब संस्थेचे सहसचिव इम्रान नाईक साहेब प्राचार्य शेख हारुन बशीरोद्दिन, सहशिक्षक युसुफ देशमुख सर शेख अब्दुल गनी सर शेख अझहर सर तसेच सहशिक्षिका शेख फरहीन तबस्सुम , शेख शाहिस्ता मैडम यांनी सर्व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# ठाणे जिल्हयाचा बारावीचा निकाल ९३.७४ टक्के, यंदा मुलींनी मारली बाजी

प्रतिनिधी । ठाणे

उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे सन २०२४-२५ चा इयत्ता बारावीचा निकाल सोमवारी जाहीर झाला असून यंदा जिल्ह्याचा ९३.७४ टक्के निकाल लागला असल्याची माहिती ठाणे जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांनी दिली. यंदाच्या वर्षी ठाणे जिल्ह्यातून बारावीच्या परिक्षेला ४९ हजार ०१ मुले आणि ४७ हजार ८८ मुली असे एकूण ९६ हजार ०८९ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. त्यापैकी ८९ हजार ८२७विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. जिल्ह्यातील उत्तीर्ण झालेल्या ८९ हजार ८२७ विद्यार्थ्यांमध्ये ४५ हजार १७० मुले आणि ४४ हजार ६५७ मुलींचा समावेश आहे.



यंदाही जिल्ह्यात बारावीच्या निकालात मुलींनी बाजी मारली आहे. जिल्ह्यात ९२.४७ टक्के मुले तर, ९५.०६ टक्के मुली उत्तीर्ण झाले आहेत.गेल्यावर्षी प्रमाणे यंदाही विज्ञान शाखेचा सर्वाधिक म्हणजेच ९७.२२ टक्के निकाल लागला आहे, अशी माहिती जिल्हा शिक्षण विभागाकडून देण्यात आली.- ठाणे जिल्ह्यात नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील विद्यार्थी सरसयंदाच्या वर्षी ठाणे जिल्ह्यात नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील विद्यार्थी बारावी परिक्षेच्या निकालात सरस ठरले आहेत.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना महामानव अभिवादन ग्रुपचे विनम्र अभिवादन

प्रतिनिधी । बीड

रयतेचे राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १०३ व्या स्मृतिदिनानिमित्त छत्रपती संभाजी क्रीडा संकुलन येथील पुतळ्यास महामानव अभिवादन ग्रुप व शासकीय नर्सिंग कॉलेज जिल्हा रुग्णालय, बीड यांच्यातर्फे पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महामानव अभिवादन ग्रुपचे मार्गदर्शक आयु. डी.जी. वानखेडे, कॅप्टन राजाभाऊ आठवले,(मेजर समता सैनिक दल, बीड) आयु. प्रशांत वासनिक, एडवोकेट तेजस वडमारे तसेच शासकीय नर्सिंग कॉलेज जिल्हा रुग्णालय बीड चे प्रचार्य डॉ. सुवर्णाताई बेंद्रे, उपप्रचार्य श्रीमती शीला मोहिते, आणि इतर प्राध्यापक व विद्यार्थी यांनी राजर्षी रयतेचे राजे छत्रपती शाहू महाराज यांना स्मृतिदिनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी बसपाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत वासनिक यांनी रयतेचे राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून महिलांसाठी व बहुजनांसाठी महाराजांनी दिलेल्या आरक्षणाविषयी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून महिलांना दिलेली सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व धार्मिक स्वातंत्रता याविषयी विस्तृत अशी माहिती दिली. महिला आरक्षणाच्या माध्यमातून देशाच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, श्रीमती द्रोपदी मुर्मु व अनेक मुख्यमंत्री, आयएएस, आयपीएस झालेल्या स्त्रियांनी याचा कशाप्रकारे लाभ घेऊन सत्ता प्रस्थापित केली याविषयी विस्तृत माहिती दिली. स्त्रियांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेल्या कार्याचा विसर न पडू देता त्यांना सतत स्मरणात ठेवून समता प्रस्थापित करण्यासाठी काम करावे व देशांमध्ये समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या विचारसरणीला अमलात आणून देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येक नागरिकांनी काम केले पाहिजे. देशामध्ये जातीयता, विषमता, वर्गवाद, वर्णवाद यापासून अलिप्त राहून देशात शांतता कशी राहील याकरिता तरुणांनी व सर्व नागरिकांनी देशाचे उज्वल भवितव्य घडविण्यासाठी सर्व जातीधर्मांना एकत्रित आनुन देशाच्या हितासाठी झटने कसे गरजेचे आहे हे स्पष्ट केले. तथागत भगवान बुद्धांचा हा भारत देश समतेचा पुरस्कर्ता आहे. सर्व जाती, धर्मांना, विविधतेंना एकत्रित गुण्या गोविंदाने नांदता येईल यासाठी घटनेनुसार आपले हक्क व कर्तव्याची जान ठेवून वागणे गरजेचे आहे. असा आशावाद व्यक्त करुन महाराजांना विनम्र अभिवादन करण्यात आले.



# बीडचा पाणी प्रश्न तत्काळ सोडवा; पालकमंत्री ना.अजित पवारांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

## डॉ.योगेश क्षीरसागरांच्या मागणीची दखल; लवकरच पाणी टंचाई दूर होण्याची अपेक्षा

प्रतिनिधी । बीड





शहरातील गंभीर पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याशी चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. या मागणीची गंभीर दखल घेत पालकमंत्री अजितदादा पवार यांनी तत्काळ बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना फोन करून आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे शहरातील पाणी टंचाई दूर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बीड शहरातील नागरिकांना गेल्या काही महिन्यांपासून नियमित आणि वेळेवर पाणी मिळत नसल्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येच्या समाधानासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. नागरिकांची भावना लक्षात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी हा प्रश्न पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर मांडला. त्यानंतर अजितदादा यांनी दिलेल्या सूचनांनुसार प्रशासनाकडून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी यंत्रणा सक्रिय झाली आहे. प्रशासनाकडून लवकरच पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पावले उचलण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांतून समाधान व्यक्त होत असून, लवकरच शहरातील पाणी टंचाई दूर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# केज तालुक्यातील ६० टक्के शेतकरी पीक विम्यापासून वंचित

## सरसकट पीक विमा देण्याची होतेय मागणी

प्रतिनिधी @ केज

केज तालुक्यात २०२४ मधील खरीप हंगामात सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीने प्रत्येक शेतकऱ्यांच्या सोयाबीन कापूस या पिकांसह इतर पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असतानाही काही शेतकऱ्यांना त्यावेळी झालेल्या पीक नुकसानीची विमा कंपनीकडे ऑनलाइन तक्रार अर्ज सादर करता न आलेल्या तब्बल ६० टक्के शेतकरी या पीक विम्या पासून वंचित असून सरसकट पीकविम्याची रक्कम देण्यात यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

कधी अस्मानी तर कधी सुलतानी संकटांमुळे दरवर्षी शेतकरी नुकसान सोसत असून प्रत्येक वेळी त्याच्या पदरी निराशाच येते आहे.या स्थितीतून शेतकऱ्यांना आर्थिक हातभार लावण्यासाठी त्यांच्या पिकाला आर्थिक संरक्षण देण्या साठी प्रधानमंत्री पीकविमा योजना सुरू करण्यात आली.मात्र, योग्यवेळी व नुकसानी च्या प्रमाणात शेतकऱ्यांनापीकविम्याची रक्कम मिळत नसल्याने योजनेचा हेतू साध्य होताना दिसत नाही.खरीप २०२४ मध्ये पंतप्रधान पिक विमा योजनेअंतर्गत केज तालुक्यातील शेतकऱ्यांनी २ लाख २२ हजार ६९० पीक विमा अर्ज दाखल करत १लाख १० हजार ३६५ हेक्टर जमीनीवरील पिकविमा संरक्षित केला.सर्वाधिक विमा हा सोयाबीन पिकावर उतरण्यात आला होता. गतवर्षी सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे पिकांचे नुकसान झाले.त्या नुकसानीची ऑनलाइन तक्रारअर्ज विमा कंपनी कडे केलेले ९० हजार २८ अर्ज विमा भरपाई साठी पात्र ठरले आहेत. उर्वरित शेतकऱ्यांचेअर्ज विविध कारणांमुळे फेटाळण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. केज तालुक्यातील पीक नुकसानभरपाईस पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना ४१कोटी ५९ लाख ६० हजार ६८८ रुपयांची विमा रक्कम मिळणार आहे.तसेच पीक नुकसान भरपाईस पात्र ठरलेले बहुतांश शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रक्कम जमा झाल्याचेही शेतकरी सांगत आहेत.विमा लाभधारक शेतकरी समाधान व्यक्त करत असले तरी केज तालुक्यातील निम्म्या पेक्षा जास्त शेतकरी अद्यापही विम्याच्या प्रतीक्षेत आहेत.पीक विम्याच्या गंभीर प्रश्ना कडे लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष देऊन राहिलेल्या ६० टक्के शेतकऱ्यांना पीक विमा मिळवून द्यावा अशी मागणीही शेतकऱ्यातून होत आहे.

या कारणामुळे शेतकरी पिक पीकविम्यापासून वंचित

१) नैसर्गिक अथवा स्थानिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यानंतर ७२ तासाच्या आत पिक विमा कंपनीकडे ऑन लाइन तक्रार दाखल करावी लागते.हे शेतकऱ्यांना माहितीच नाही २) अनेक शेतकरी अजूनही स्मार्टफोन वापरत नाहीत. ३) तक्रार करण्याचा प्रयत्न करताना विमा कंपनीची वेबसाईट/ प चालली नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.४) ई-पीक पाहणी आणि पीक नुकसानीची विमा कंपनीकडे तक्रार या दोन बाबीवेगवेगळ्या आहेत परंतु शेतकरी दोन्ही एकच समजत असल्याने शेतकऱ्यांची परिस्थिती गोंधलेली आहे. ५) यासह अनेक कारणामुळे पिकांचे नुकसान होऊनही शेतकरी पिकांची ऑनलाईन तक्रार करू शकले नाहीत

# लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची बालवैज्ञानिक म्हणून निवड

प्रतिनिधी @ कडा

येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित, महावीर इंग्लिश स्कूल या सी बी एस ई बोर्ड मान्यता प्राप्त शाळेतील शौर्य आंदुरे (इ.८वी), निशिता नहार ( इ-९ वी) आणि अक्षरा गांधी (इ - १०वी) या तीन विद्यार्थ्यांची वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद (सी एस आय आर) जिज्ञासा. अंतर्गत एक दिवसीय बालवैज्ञानिक म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

या तीन विद्यार्थ्यांची सी बी एस ई बोर्ड आणि एन सी ई आर टी ने मिळवून प्रथम चाचणी घेण्यात आली आणि त्यानंतर या विद्यार्थ्यांची सी एस आय आर अंतर्गत राष्ट्रीय प्रयोगशाळेत की जिथे भारताच्या पंतप्रधानांनी परवानगी दिलेल्या प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञांसोबत या विद्यार्थ्यांना नव - नवीन गोष्टी शिकायला मिळणार आहेत आणि त्याच बरोबर त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळणार आहे. पुणे रिजनल विभागातून फक्त ५० विद्यार्थ्यांची एक दिवसीय बालवैज्ञानिक म्हणून निवड करण्यात आलेली असून त्यामध्ये बीड जिल्ह्यातून फक्त महावीर इंग्लिश स्कूल च्या तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष- श्री अमितजी राठोड, उपाध्यक्ष- श्री. संदिपजी चानोदीया, सचिव - श्री. हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष- श्री डॉ. प्रमोदजी भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी श्री मनीषजी गांधी, श्री. प्रकाशजी श्रीश्रीमाळ, श्री. अमोलजी पटवा, श्री. संजयजी पितळे, श्री. संतोषजी गांधी, मुख्याध्यापक - श्री अभिलाष के. के,सल्लागार श्री मेहेर सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



नांदेड /उध्दव सरोदे

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे तथा प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे यांच्या मार्गदर्शन व निर्देशानुसार नांदेड जिल्ह्यातील कार्यकारिणीचा विस्तार करण्यासाठी शहरातील नामांकित विसावा हॉटेल येथे बैठक पार पडली. सदर बैठकीचे आयोजन जिल्हाध्यक्ष संग्राम पाटील मोरे व ग्रामीण जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत मुळे यांनी केले होते.या बैठकीत विद्यमान कार्यकारिणीचा विस्तार करण्यासह या संघटनेचे काम व्यापक करण्याबाबत चर्चा होऊन

विस्तारित कार्यकारिणीत आमचे मित्र तथा दै.सत्य मराठी वर्तमानपत्राचे संपादक अयुबखान पठाण यांची जिल्हा उपाध्यक्ष पदी तर दै.सकाळचे जिल्हा प्रतिनिधी रामेश्वर काकडे यांची जिल्हा कार्याध्यक्ष व युवा काँग्रेस नेते बापूसाहेब पाटील यांची जिल्हा सरचिटणीस म्हणून निवड झाल्याने निवडीचे नियुक्तीपत्र सर्वांना देण्यात आले.

# मुक्या प्राण्यांसाठी जलकुंड ठेवून मोफत सेवेचा यज्ञ!

प्रतिनिधी @ आष्टी

४० सेल्सीअंश पेक्षाही जास्त उन्हाचा तापमानाचा कडाका पडल्याने पशु - पक्षी प्राण्यांचा जीव कासावीस होत आहे. सर्वत्र पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झालेले असतानाच मुक्या प्राण्यांसाठी धावून येत मोफत पाण्याचे कुंड ठेवून सेवा देणारे आणि खऱ्या अर्थाने या प्राण्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणारे विधिज्ञ रत्नदीप निकाळजे यांच्या कर्तव्य भावनेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

आष्टी येथील प्रसिद्ध विधीज्ञ रत्नदीप निकाळजे यांनी आष्टीच्या स्व. अनिल भैय्यानगर मध्ये सुमारे २०० लिटर क्षमतेचे तीन जलकुंड ठेवून मोफत सेवा सुरू केलेली आहे. विशेष म्हणजे दररोज सकाळ, दुपार आणि संध्याकाळ असे तीनही वेळी हे जलकुंड पाण्याने पुन्हा पुन्हा भरवले जातात. विधिज्ञ रत्नदीप निकाळजे यांचे वडील स्व. भीमरावदादा निकाळजे यांनी अखंड ३० वर्ष मोफत पिण्याचे पाणी वाटप केलेले आहे आणि हीच परंपरा जपण्याचे मौलिक कर्तव्य पुढे जपण्यात आले आहे. आजही पाण्याचे अत्यंत दुर्भिक्ष असताना पिण्याचे पाणी मोफत वाटप करून मानवी जीवन आणि मनाची कृतज्ञता जपण्यात विधीज्ञ रत्नदीप निकाळजे यशस्वी झाले आहेत. आष्टीमध्ये मानव, पशु - पक्षी प्राण्यांची अत्यंत उन्हाळ्याच्या कडक भयावह परिस्थितीमध्ये जलसेवक म्हणूनच आज नावलौकिक निर्माण झाला आहे. निस्वार्थ भावनेने केलेली ही मोफत सेवा मानवी मूल्य जपणारी आहे अशा प्रतिक्रिया जेष्ठ समाजधुरिणांकडून व्यक्त केल्या जात आहेत.




संकटकाळात धावून येण्याची मानवी मनाची सातत्याने तयारी ठेवणारे विधीज्ञ रत्नदीप निकाळजे आष्टीत सामाजिक बांधिलकीची भावना ठेवून असे उपक्रम निरंतर करतात. यासंदर्भात आमच्या प्रतिनिधींनी त्यांच्याशी संवाद साधला असता ही कर्तव्य भावना घराण्यामध्ये अखंड ३० वर्षापासून असल्याने आम्हाला कर्तव्य भावनेतून कृतज्ञता व्यक्त करत आनंद वाटतो आणि समाधान सुद्धा. अशी निःसंदिग्ध भावना रत्नदीप निकाळजे यांनी व्यक्त केली.

# मुख्याधिकारी चव्हाण यांच्या विरोधात आत्मदहन करणार के.कम्प चे माजी सरपंच विलासराव साळवे

प्रतिनिधी । माजलगांव

माजलगाव दि.०७.०५.२०२५. माजलगाव शहरापासून जवळच असलेल्या केसापुरी या ठिकाणी नगर परिषदेने शहरातील घनकचरा टाकण्यासाठी डम्पिंग ग्राउंड असून या ठिकाणी कचऱ्यावर प्रक्रिया करण्याऐवजी हा कचरा आठ दिवसात एकदा जाळला जाऊ लागला आहे वेळीच उपाययोजना नाही केली तर केसापुरीकर आंदोलन करणार मागच्या दोन महिन्यापासून घनकचऱ्याची आग सुरूच होती धुरामुळे अनेक गावातील केसापुरी कम्प या नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे यासाठी नगरपालिकेला अनेक वेळा सांगून काहीच फरक पडला नाही या विरोधात केसापुरीचे माजी सरपंच विलासराव साळवे यांनी १७ मे २०२५ रोजी उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. या स्वच्छतेसाठी महिन्याला २५ लाख रुपये खर्च केला जात होता डंपिंग ग्राउंड वर टाकलेला कचरा आठ दिवसात एकदा जाळला जातो हा कचरा जळल्याने दोन-तीन दिवस भिजत नाही त्यामुळे शेजारीच असलेल्या केसापुरी सादोळा भाटवडगाव केसापुरी कॅम्प आबुजवाडी



सादोळा आष्टी या गावातील येणाऱ्या जाणारा मोटरसायकल वरील नागरीकांना मोठा प्रमाणात प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागत आहे यामुळे या गावातील केसापुरी कॅम्प च्या युवक व वृद्ध नागरिकांना दम्याच्या त्रासाने त्रस्त झाले आहेत माजलगाव नगरपरिषद देणे बनवलेल्या डम्पिंग ग्राउंड मध्ये नगरपरिषद कचरा आणून टाकते हा कचरा आणतात कचरा रस्त्यावर पडतो यामुळे दुर्गंधी पसरते घाण वास येतो मोटारसायकल वर जाणार लोकांना नाहक त्रासला समोर जावा ये लागतात अनेक गावांचे नागरिक या रोजच्या धुरामुळे परेशान होतात याबाबत गावातील ग्रामस्थांनी नगरपरिषदेला अनेक वेळा लेखी व तोंडी निवेदन करूनही याचा काहीच फायदा होईना उलट नगर परिषदेचे मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांना या गावच्या प्रतिष्ठित नागरिकांनी भेटून याबाबत सांगितले असता त्यांनी या लोकांना हुजत घालून पुढे बघू ची भाषा वापरल्याचे देखील नागरिक बोलत आहेत शहरातून उचलण्यात येणारा ओला व वाळला कचरा वेगळा न करता एकत्र म्हणून तो काही दिवसांनी रात्रीच्या वेळीस जाळला जातो ओलावाला कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी केवळ नावालाच मशनरी आणून त्यावर प्रक्रिया केली जात नाही व माजलगाव नगर परिषदच्या अधिकारी यांचे पितळ उघडे पडेल म्हणून हा कचरा जळण्यात येत असल्याचा आरोप केसापुरीचे माजी सरपंच विलास साळवे व संस्थानिक नागरिक करित आहेत

# बीड तालुका कामगार मंडळाच्या बोगस कारभाराला आळा घालण्यासाठी सर्वसामान्य कामगाराना सोबत घेऊन रस्त्यावर उतरणार-प्रा सापनकर

प्रतिनिधी । बीड

बीड तालुका कामगार मंडळ हे पैशाच्या तालावर नाचणार कामगार मंडळ असुन कामगार मंडळाचे हात भ्रष्टाचाराने बरबटलेले आहेत या भ्रष्ट काराभारा विरूध्द सर्वसामान्य जनता पेटून उठली असुन गोरगरीब जनतेला कामाच्या नावाखाली पिळवणुक होत असुन जनतेकडून पैशाची मागणी करून खुलेआम पैसे कामगार मंडळ घेत आहे. गोरगरीब जनतेची कोणत्याही प्रकारचं गांभीर्य लक्षात न घेता गोरगरीब जनतेशी वागणूक ही अतिशय बेकार दिले जाते. गोरगरीब जनतेतुनं आवाज उठत आहे ,

बीड जिल्ह्यातील कामगार मंडळ बोगस कारभार चालू आहे तरी जिल्हा कामगार अधिकारी श्रीहरी मुंडे व कामगार मंडळाचे राज्याचे सचिव विवेक कुंभार बीड तालुका कंत्राटी कर्मचारी तुषार कुंभार व प्रवीण सुरवसे सरास यांना पाठराखण करतात गोरगरीब कामगारांना पिळवणूक करतात, वृद्ध महिला व पुरुषांना आरेरावीच्या भाषांमध्ये बोलतात सर्रास बीड जिल्ह्यातील कामगार मंडळामध्ये पैशाचा भडीमार चालू आहे गाव गाड्यातील गोरगरीब जनतेची दिशाभूल केली जात आहे मी राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने माननीय जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन दिलेले आहे व माहितीचा अधिकार २००५ अधिनियम नुसार सदरील जिल्हा कामगार अधिकारी श्री हरी मुंडे यांना ऑफिस मध्ये जाऊन दिला आहे त्यांनी मला थातूरमातूर उत्तर देऊन दिशाभूल केलेली आहे, यांना कुठल्याही प्रकरणाची गांभीर्य नाही कंत्राटी कर्मचाऱ्यांना एवढी का मस्ती आहे गोरगरीब जनतेला बोलतात आमचं कुणी काही वाकड करू शकत नाही आमचे सचिव पाहुणे आहेत व जिल्हा कामगार अधिकारी साहेब आमचे चांगले संबंध आहेत ते पण आम्हाला काही करू शकत नाहीत तुम्हाला ज्याला सांगायचे त्यांना जाऊन सांगा अशी मस्तीमध्ये बोलतात प्रत्यक्ष जिल्हा कामगार



अधिकाऱ्यांना सुद्धा कुठल्या प्रकारची बेजबाबदारपणा दिसत नाही ते पण डायरेक्ट बोलतात त्या दोघांचा विषय सोडून तुम्ही मला दुसरे काम सांगा माझे दोन महिने रिटायरमेंटला राहिलेले आहेत त्यामुळे मला या राड्यात पडायचं नाही असं बे जबाबदार पणाने वक्तव्य करतात कामगार मंडळामध्ये गोरगरीब जनतेला खरा बाजूलाच राहिला यामध्ये काही नोकरदारांना सुद्धा यामध्ये लाभ दिला आहे हे निदर्शनामध्ये आला आहे माझ्या ग्रामसेवकाचे खोटे शिक्के सह्या मारणे कामगार मंडळाचे शिक्के डुप्लिकेट बनवून घेतले आहेत वरच्यावर सह्या करून घेणे इत्यादी भोंगळ कारभार चालू असताना सुद्धा राजकीय प्रस्थापित मंडळींनी या प्रकरणाची दखल घेतलेली नाही हा आवाज राष्ट्रीय समाज पक्षाने उठवला आहे प्रा, बाळासाहेब सापनकर सर यांनी उठवला आहे जोपर्यंत बे जबाबदार अधिकारी यांना जागेवर आण्लयाशिवाय राहणार नाही तोपर्यंत हा लढा माझा चालूच राहणार आहे येणाऱ्या दोन-तीन दिवसांमध्ये जिल्हा कार्यालय समोर आमरण उपोषणाच्या इशारा देतोय माननीय कलेक्टर साहेबांना कळकळीची विनंती करतोय आपण या प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशा उद्धट अधिकाऱ्यांना आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना धडा शिकवण्यात यावा अशी विनंती करतो या घटनेला आळा बसला नाही तर आम्ही कामगार मंडळाच्या तोंडाला काळं फासून आमरण उपोषणाला बसणार आहोत इशारा राष्ट्रीय समाज पक्षाचे बीड तालुका अध्यक्ष प्रा. बाळासाहेब सापनकर यांनी दिला आहे

## बायकोला नांदायला का पाठवत नाही म्हणून जावयाची सासूला मारहाण

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

दारु पिऊन बायकोला मारहाण करणाऱ्या जावयाने सासूला बेदम मारहाण केल्याची घटना घडली असून, यासंदर्भात अंबाजोगाई पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.यासंदर्भातील सविस्तर वृत्त असे की, अंबाजोगाई शहराजवळील शेपवाडी येथील शुशाला साधू ताळीकोटे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांची मुलगी पुजा पद्माकर साळे हिचे लग्न दस्तगीर वाडी येथील पद्माकर साळे सोबत झाले होते.तिचा नवरा दारू पिऊन सतत मारहाण करत असल्यामुळे ती मागील तिन महिन्यांपासून मुलां बाळांसह माहेरी राहण्यासाठी आली होती.

दि.६ मे २०२५ रोजी त्यांचा जावई सायंकाळी ४ वाजता मुलीला नांदायला का पाठवत नाही म्हणत दारु पिऊन शिवीगाळ करून लाथा बुक्याने मारहाण केली व डोक्यात दगडाने मारुन दुखापत केली.भांडण सोडवण्यासाठी मुलगी पुजा आली असता तिला सुध्दा मारहाण केली.व तू नांदायला आली नाही तर तुला व तुझ्या खानदानाला जिवे मारुन टाकीन अशी धमकी दिली.याप्रकरणी शुशाला ताळीकोटे यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई पोलीसात आरोपी पद्माकर साळे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

# माजी उपमुख्यमंत्री मा. छगनरावजी भुजबळ साहेब आणि समता परिषदेच्या लढ्याला मिळाले यश - ॲड. सुभाष राऊत

## स्थानिक स्वराज्य संस्थांतील ओबीसीचे आरक्षण कायम ठेवल्याबद्दल बीडमध्ये समता परिषदेचा जल्लोष

प्रतिनिधी @ बीड

ओबीसी राजकीय आरक्षणासंदर्भात माजी उपमुख्यमंत्री मा. छगनरावजी भुजबळ साहेब आणि समता परिषदेच्या पाठपुराव्याला मोठे यश प्राप्त झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी समाजाला सन २०२२ पूर्वी लागू असलेले २७ टक्के राजकीय आरक्षण पूर्ववत करण्याचे आणि राज्यात पुढील ४ महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. याबद्दल समता परिषदेचे राज्य सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष ड. सुभाष राऊत यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले असून राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा.छगनरावजी भुजबळ साहेब, ज्यांच्या माध्यमातून हा पाठपुरावा सुरू होता असे माजी खासदार समीरभाऊ भुजबळ यांच्यासह देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस साहेब यांचे आभार व्यक्त केले आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे राज्यभरातील ओबीसी समाजाने स्वागत केले असून बीड शहरामध्ये समता परिषदेच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यासमोर फटाके वाजवून आणि पेढे वाटून न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. याला आज मोठे यश मिळाले असून सुप्रीम कोर्टासह देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांचे विशेष सहकार्य लाभलेले आहे. राज्यात सन २०२२ नंतर ओबीसी आरक्षणासंदर्भात नेमण्यात आलेल्या बांठिया कमिशनने योग्यरित्या अहवाल गोळा न केल्याने ओबीसींचे राजकीय आरक्षण धोक्यात आले होते. या विरोधात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने सुप्रीम कोर्टात ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी याचिका दाखल करण्यात आली होती. याबाबत माजी खासदार समीरभाऊ भुजबळ हे स्वतः विशेष लक्ष देऊन सुप्रीम कोर्टात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने विशेष प्रयत्न करत




होते. याचिकेच्या सुनावणीदरम्यान माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, माजी सनदी अधिकारी महेश झगडे, ड. मंगेश ससाणे हे ज्येष्ठ वकिलांसह दिल्लीत उपस्थित होते. त्यांनी सर्वांशी चर्चा करून आपली भूमिका मांडली. या लढ्याला यश प्राप्त झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत निर्णय देताना सुप्रीम कोर्टाने सन २०२२ च्या पूर्वी असलेले ओबीसींचे २७ टक्के राजकीय आरक्षण कायम ठेऊन निवडणुका घेण्याचा महत्वपूर्ण निर्णय दिला आहे. ओबीसी, भटक्या विमुक्त समाजाच्या राजकीय अस्तित्वासाठी हा अतिशय महत्वपूर्ण निर्णय आहे. गेल्या आठवडाभरात ओबीसींच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे दोन निर्णय झाले असल्याने ओबीसी समाजात आनंद व्यक्त करण्यात येत आहे. केंद्र सरकारने घेतलेला जातनिहाय जनगणनेचा निर्णय, तसेच सुप्रीम कोर्टाने दिलेला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातील निर्णय हे ओबीसींच्या अस्तित्वासाठी अतिशय महत्वाचे आहेत असे प्रतिपादन समता परिषदेचे राज्य सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांनी व्यक्त केले आहे.

सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाचे स्वागत करत बीड शहरातील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्री माता फुले यांच्या पुतळ्यासमोर बीड जिल्हा समता परिषदेच्या वतीने आनंद उत्सव साजरा करण्यात आला असून फटाक्यांची आतिषबाजी करत पेढे वाटप करण्यात आले.

यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष ड. सुभाष राऊत, परीट समाजाचे नेते गणेश जगताप, माळी महासंघाचे नेते प्रा. लक्ष्मण गुंजाळ, सोनार समाजाचे नेते ड. संदीप बेदरे, धनगर समाजाचे नेते रणजीत सोन्नर, समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन साखरे, शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष अजिंक्य सुरवसे, मोहनराव गोरे, महेश व्यवहारे, निलेश राऊत, पांडुरंग सत्वधर, अजय काळे, रोहित जमदाडे, मंगेश जमदाडे, महेश चौधरी आदींसह समता सैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## वडवणीचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

प्रतिनिधी @ वडवणी

वडवणी नगरीचे कार्यतत्पर व अभ्यासू नगराध्यक्ष शेषेराव बाप्पू जगताप यांचा वाढदिवस काल दि.७ मे २०२५ बुधवार रोजी कोणताही बडेजाव न करता अतिशय साध्या पध्दतीने मात्र उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी संपूर्ण दिवसभर त्यांच्या हितचिंतक, स्नेहीजण, मित्रपरिवार व चाहत्या वर्गाने मोठी गर्दी केली होती. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, माजी मंत्री तथा आमदार प्रकाश दादा सोळंके, माजी मंत्री तथा आमदार सुरेश आण्णा धस, माजी सभापती जयसिंग भैय्या सोळंके यांसह सर्वांनी त्यांचे वाढदिवसाच्या निमित्ताने अभिष्टचिंतन करुन शुभेच्छा दिल्या.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी शहराचे दबंग तथा अभ्यासू नगराध्यक्ष म्हणून शेषेराव बाप्पू जगताप यांना ओळखले जाते. शेषेराव जगताप यांना मानणारा मोठा तरुण वर्ग वडवणी शहरासह तालुक्यात पहावयास मिळतो. काल दिनांक ७ मे २०२५ बुधवार रोजी शेषेराव जगताप यांचा वाढदिवस कोणताही मोठा गाजावाजा किंवा बडेजाव न करता अत्यंत साध्या पध्दतीने परंतू मोठ्या हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. वडवणी नगरपंचायत प्रशासन यांसह शहरातील व्यापारी वर्ग, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय अशा सर्व स्तरातील नेतेगण, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी तसेच सर्व शासकीय कार्यालयांचे कार्यालय प्रमुख तथा कर्मचारी वृंद यांनी प्रत्यक्ष तसेच भ्रमणध्वनीव्दारे त्यांचे वाढदिवसाच्या निमित्ताने अभिष्टचिंतन करुन शुभेच्छा दिल्या व त्यांचे पुढील आयुष्य हे निरोगी व भरभराटीचे जावो असे मनोकामना व्यक्त केल्या. यात खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आमदार प्रकाशदादा सोळंके, आमदार सुरेश आण्णा धस, माजी आमदार आर.टी.जिजा देशमुख, माजी आमदार केशवदादा आंधळे, ज्येष्ठ नेते धैर्यशील काका सोळंके, युवा नेतृत्व जयसिंग भैय्या सोळंके, छत्रपती कारखान्याचे चेअरमन मोहनदादा जगताप, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, पाटोदा नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, बाजार समितीचे सभापती संभाजी तात्या शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, नगरसेवक बाबा वाघमारे, नगरसेवक नागेश डिगे, गटनेते अस्लम भैय्या कुरेशी, बाजार समितीचे संचालक अभिमान कदम, माजी सरपंच ॲड.विकास मुंडे, माजी सरपंच गंपूशेठ पवार, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संतोष पवार, मुख्याधिकारी पोपट निगळ, गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, अभियंता रमेश बहिर, नगरसेवक गुरुप्रसाद माळवदे, सरपंच बंडू नाईकवाडे, युवा नेते अमरसिंह मस्के पाटील, माजी सरपंच हरी पवार, मानवी हक्क अभियानचे विष्णू मुजमुले, माजी सरपंच भिमराव उजगरे, डॉ.भाऊसाहेब पुर्भे, आण्णा महाराज दुटाळ, डॉ.शंकर वाघ, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुरेश भोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुग्रीव मुंडे, रयत क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष संदिप वाव्हळे यांच्यासह, राजकीय, सामाजिक, व्यवसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी शेषेराव जगताप यांना भरभरुन शुभेच्छा दिल्या. दरम्यान सर्वांचे आपल्यावर असलेले प्रेम यातून जीवनभर उतराई होणे अशक्य आहे. शेवटच्या श्वासापर्यंत सर्वांच्या ऋणात राहील अशी भावनिक प्रतिक्रिया याप्रसंगी शेषेराव जगताप यांनी व्यक्त केली.


# दांडी बहाद्दर अधिकाऱ्यांमुळे आष्टीचे ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय वाऱ्यावर

## नऊ कर्मचाऱ्यांपैकी फक्त एक शिपाई हजर एक कनिष्ठ अभियंता दौऱ्यावर

प्रतिनिधी @ कडा

आष्टी ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयातील एक शिपाई सोडला तर इतर सर्व कर्मचाऱ्यांनी अधिकारी गैरहजर असल्याचे सोमवार दि.५ एप्रिल रोजी दिसून आले. सकाळी या कार्यालयातील सर्व अधिकाऱ्यांच्या खुर्च्या रिकाम्याच्या असल्याचे पाहायला मिळाले.

आष्टी येथील पंचायत समितीमध्ये तालुका ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे कार्यालय असून या कार्यालयामार्फत आष्टी तालुक्यातील गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या योजना राबवल्या जातात.सध्या उन्हाळी परिस्थिती असल्याने आष्टी तालुक्यामध्ये अनेक गावांमध्ये पाणीटंच निर्माण झालेली आहे असे असतानाही हे कार्यालय मात्र गंभीर नसल्याचे दिसून येत आहे.केंद्र सरकारचे महत्वकांक्षी योजना असलेले जल जीवन मिशन हे देखील योजना या कार्यालयाच्या अनागोंदी कारभारामुळे रखडले असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान आष्टी येथील मनसेचे कैलास



दरेकर यांनी या कार्यालयाला सोमवार सकाळी ११ वा.भेट दिली असता कार्यालयात एक शिपाई सोडता इतर सर्व अधिकारी व कर्मचारी गैरहजर असल्याचे दिसून आली त्यामुळे आष्टी येथील ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय वाऱ्यावर असल्याचे दिसून आले.

आष्टी येथील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयामध्ये एकूण नऊ कर्मचारी अधिकारी आहेत. यामध्ये एक उपभियंता, पाच कनिष्ठ अभियंता, एक कनिष्ठ सहाय्यक तर दोन शिपाई आहेत.सोमवार दिनांक ५ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास या कार्यालयात फक्त एक शिपाई उपस्थित होता तर ही तर सर्व कर्मचारी गैरहजर होते. यापैकी जे.एस.भवर हे डोईठाण येथे साइटवर गेल्याचे येथील नोंदवहीत नमूद केलेले होते इतर अधिकाऱ्याबाबत मात्र या नोंदवहीत काहीच आढळून आले नाही.

आष्टी येथील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयाचे उपभियंता गोविंद भुजबळ यांना भ्रमणध्वनीवरून संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी फोन न उचलल्याने संपर्क न झाल्याने त्यांची बाजू कळाले नाही.

### दांडी बहाद्दर अधिकाऱ्यांवर कारवाई करावी

आष्टी येथील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयातील अनेक अधिकारी हे सतत गैरहजर असतात.साइटवर गेल्याचे इतर ठिकाणी जातात त्याचबरोबर येथील कार्यालयातील नोंदवहीत ते नोंद करत नाहीत. सध्या उन्हाळा असल्याने तालुक्यात पाणीटंचाई निर्माण झालेली आहे असे असतानाही या कार्यालयातील अधिकारी सतत गैरहजर राहतात किंवा उशिरा येतात त्यामुळे अशा अधिकारी कर्मचाऱ्यांवर बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कारवाई करावी.

– कैलास दरेकर, मनसे जिल्हाध्यक्ष

## ओ.बी.सी पालकांनो सावधान शैक्षणिक नुकसान होऊ नये

बीड(प्रतिनिधी)

आज ६ मे २०२५ रोजी हिंदू मुस्लिम ओबीसी- भटके विमुक्त संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव आणि शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्रासाठी जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब यांना निवेदन देण्यात आले आहे, निवेदनात म्हंटले आहे की हिंदू मुस्लिम ओबीसी आणि भटक्या विमुक्त जाती जमातीतील अनेक समस्या प्रलंबित आहे जसे की क्रिमिलीयर ची अट रद्द करणे, पदोन्नतीतील आरक्षण पूर्ववत करणे, बार्टी, मार्टी,सारथी, महाज्योती संस्थे प्रमाणे वनार्टी संस्थेला भरीव निधी देणे, विशेष म्हणजे आता बारावीची निट, मेडिकल, सी.ईटी. इत्यादी परिक्षा झाल्या असून आता त्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे, अनेक विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणे प्रलंबित आहेत यासाठी सक्षम अधिकारी यांनी तातडीने आणि तात्काळ हिंदू मुस्लिमांतील पोटजातीचे तसेच ख्रिश्चन बौद्ध व इतर सर्व ओबीसी समाजातील जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ देण्यात यावे, रमाई घरकुल योजना, शबरी घरकुल योजना, प्रमाणेच भटक्या विमुक्ताचे यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना बाबतच्या किचकट अटी रद्द करून ही योजना प्रभावीपणे राबवण्यात यावी तसेच भटक्या नियुक्त साठी असलेली शहरी ग्रामीण पंतप्रधान आवास योजना गर्जेवत पर्यंत पोहोचवावी, जिल्हास्तरावर प्रत्येक तालुक्यात भटके विमुक्त हिंदू मुस्लिम ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहे बाधण्यात यावी, स्कॉलरशिप चे वाटप करावे व इतर महामंडळाप्रमाणे वसंतराव नाईक महामंडळाला आर्थिक निधीची तरतूद करावीत, भटकंती करणाऱ्यांना शासकीय योजना व शैक्षणिक गरजेसाठी असलेले जात प्रमाणपत्र, राशन, कार्ड, आधार, कार्ड, पॅन, कार्ड, मतदान कार्ड, जात वैधता प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र व इतर साठी जिल्हाधिकारी मार्फत तहसीलदार तलाठी ग्रामसेवक मुख्याधिकारी यांना आदेशित करून ज्या ठिकाणी या समूहाचे वास्तव्य असलेल्या वस्ती वाढे तांडे पाडे आहे या ठिकाणी जाऊन प्रमाणपत्र वाटप करावे या घटकासाठी राशन कार्ड संजय गांधी निराधार योजना श्रावण बाळ योजना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना घरकुल योजना शौचालय योजना इत्यादी योजनेत लाभ मिळणे गरजेचे आहे, केंद्र व राज्य शासनाने राज्यघटनेने दिलेल्या अधिकारानुसार कलम ३४० अन्वये अनेक आयोग कमिटी समित्या गठीत केलेल्या होत्या जसे कालेलकर आयोग, अग्रवाल आयोग, बापट कमिशन, विधाते आयोग, रेनके आयोग, सच्चर समिती, मुंशी समिती, खाडे समिती, अंत्रोळीकर समिती इत्यादीच्या शिफारशी लागू करून या हिंदू मुस्लिम ओबीसी भटके विमुक्त जाती जमातीच्या समूहांना न्याय देण्यासाठी आपण संबंधितांशी पत्रव्यवहार करून आमच्या निवेदनाद्वारे सादर केलेल्या मागण्या पूर्ण कराव्यात अशी मागणी हिंदू मुस्लिम ओबीसी आणि भटके- विमुक्त संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन देण्यात आले आहे यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव, शहराध्यक्ष खुर्शीद आलम, ओबीसी जिल्हाध्यक्ष शेख जाकेर,मोमीन खालेद,गुलाम जहाँगीर,मनोज चव्हाण, वजीर आत्तार,विजय गायकवाड,फारोक मन्यार, अशोक दुधाड, हकीम मन्यार, नबिल उजमा,मनोज चव्हाण,मजीद भाई, सुर्यकांत जोगदंड, शकील इनामदार,सलाम सेठ, दत्ता जाधव, सैय्यद फेरोज, भिमराव हाळे, अजहर सौदागर, अब्बास इनामदार,प्रशांत डोरले, मोईज भाई यांच्या सह अनेक हिंदू मुस्लिम ओबीसी बांधव उपस्थित होते,



मुजीब खान ।कन्नड

जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिंपरखेडा येथील नुकत्याच बारावी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा जिजामाता परिवाराचे सचिव सागर कृष्णराव जाधव सर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला

विद्यालयाचा विज्ञान व कला शाखेचा निकाल शंभर टक्के लागला असून विज्ञान शाखेतून दिव्या काकासाहेब जाधव हिने ८७.३३% गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला आहे, तसेच ऋतुजा दीपक मगर ८५.३३ चव्हाण भक्ती योगेश ८३ जाधव सृष्टी, कृष्णा ८२.६७ ऋतुजा लक्ष्मण शेजुळ ८० टक्के मिळवले,तसेच कला शाखेतून नेहा दादासाहेब शिरसाठ हिने यश संपादन केले आहे आपल्या यशाचा आलेख असाच वाढता असू द्यावा व आपल्या आई वडिलांच्या कष्टांची जाण ठेवून भविष्यातही तुमचा अधिकारी म्हणून सत्कार करण्याची संधी आम्हाला प्राप्त व्हावी असे मनोगत यावेळी सागर जाधव सर यांनी व्यक्त केले

या गुणवंत विद्यार्थ्यांचे प्राचार्य बाळासाहेब निकम पर्यवेक्षक चंद्रकांत दाबके वरिष्ठ लिपिक अजिनाथ जाधव यांनी अभिनंदन केले आहे, यावेळी प्रशासकीय अधिकारी सचिन भामरे देवेंद्र सिंग राजपूत योगेश जंजाळ दत्तात्रय गायके लक्ष्मण पांडव ज्ञानेश्वर नायकुडे शिवाजी जाधव सुभाष जाधव यांची उपस्थिती होती

# अंबाजोगाई येथे विव्हज २०२५ सांस्कृतिककला दर्शन कार्यक्रम संपन्न

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

दि.४ मे २०२५ रविवारी अंबाजोगाई येथे महाराष्ट्र शासन सांस्कृतिक विभाग, सांस्कृतीक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई वेव्हज २०२५ जागतिक परिषदेच्या अनुसंघाने विशेष कार्यक्रम कै. विलासराव देशमुख सभागृह अंबाजोगाई येथे संध्याकाळी ७ ते १० यावेळेत संपन्न झाला.या कार्यक्रमात गणेश वंदना,पोवाडा, लोकगीत,वाघ्या मुरळी, महाराष्ट्र गीत,गोंधळ, चित्रपट गीत,वेगवेगळे नृत्य प्रकार असा भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आला.वेव्हज २०२५ या माध्यमातूनकलाकारांना शासकीय मंच उपलब्ध करून देणे,आणि त्याच बरोबर कलाकारांना जागतिक पातळीवर कलेची संधी देणे अशा प्रकारची शिबिरे घेउन अनेकविध संधीउपलब्ध करून देणे असा या कार्यक्रमाचा भाग आहे. या कार्यक्रमास महाराष्ट्र शासन यांच्या कडून तहसीलदार श्री. मिलिंदराव गायकवाड,




सांस्कृतिक विभागाचे अध्यक्ष डॉ.राजेशजी इंगोले,तालमार्तंड श्री. प्रकाशराव बोरगावकर, अभय जोशी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.यावेळी कार्यक्रमाची माहिती श्री.प्रकाशराव बोरगावकर यांनी दिली. या कार्यक्रमाचे आयोजक प्रवीणजी जोगदंड आणि मित्र मंडळ हे होते.या कार्यक्रमास रंगकर्मी, रसिकश्रोते,पत्रकार, कलावंत,वादक,संगीत प्रेमी यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## भर रस्त्यावरून शहरात एकाचे अपहरण

प्रतिनिधी @ परळी

परळीतील एका नागरिकाचे भरस्त्यावरुन उचलून घेऊन जात अपहरण झाल्याची घटना मंगळवार (दि. ६) सायंकाळच्या सुमारास घडली. याप्रकरणी रात्री उशीरा ११.१७ वा. परळीच्या संभाजीनगर पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, मंगळवार दि ०६ रोजी सायंकाळी ६ वाजण्याचे सुमारास राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक ते गणेशपार रोड या मुख्य रस्त्यावरील एका हॉटेल जवळून आपहरणाची घटना घडली आहे. यातील पिडीत इसम नामें शेख अमजेद अहमद शेख वय ३५ वर्ष रा. बरकत नगर परळी वै यास अनोळखी पाच ते सहा लोकांनी पकडुन रोडवर उभ्या केलेल्या पांढऱ्या रंगाच्या ईन्व्हा गाडी मध्ये बळजबरीणे टाकुन त्याचे अपहरण करुन घेवुन गेले आहेत. अशी फिर्याद शेख जमीर शेख आमीर रा. खुदबे नगर परळी वै. यांनी दिली आहे. यावरुन आरोपी अनोळखी ईसम पाच ते सहा जणांविरुद्ध पो.स्टे. संभाजीनगर परळी वै. येथे गुरन -९६/२०२५ कलम १४० (३), बी.एन.एस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोउपनि शिंदे हे करीत आहेत.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

दैनिक समर्थ राजयोग राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


# साहित्यातील राजकारण धोकादायक - साहित्यिक अनंत कराड

## शिदोरे यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

प्रतिनिधी @ मानुर

साहित्याची निर्मिती बुद्धीवादी, विचारवंत लोक करत असून त्यांच्याकडे समाज अपेक्षेने बघत असतो. आजवर ज्या चळवळी वा क्रांत्या झाल्या यामध्ये साहित्याचा महत्त्वपूर्ण वाटा होता. लेखनातून ज्यांनी वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला त्यांना भरपूर त्रास झालेला दिसून येतो. संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून थेट आजपर्यंत चा इतिहास पाहता या गोष्टीला पुष्टीच मिळते. साहित्यातील राजकारण अतिशय धोकादायक असून यातील गट तट, कंपू, टोळ्या, जातीयवाद, वशिलेबाजी यांना कंटाळून नाईलाजाने आपल्याला एकता फाउंडेशन ची निर्मिती करावी लागली असे प्रतिपादन फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा मराठवाडा साहित्य परिषद संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जेष्ठ साहित्यिक अनंत कराड यांनी केले. कवी रूपचंद



दत्तोबा शिदोरे यांच्या 'शब्द प्रहार भावनांचे' या काव्य संग्रहाच्या प्रकाशन सोहळयात ते अध्यक्षपदावरून बोलत होते.

निवृत्त पोलिस अधिकारी कवी सुभाष सोनवणे, निवृत्त आप्पर आयुक्त किसनराव लवांडे, नगरसेविक दिपाली बारस्कर, डॉ.चंद्रकांत कदम, डॉ.बाळकृष्ण मरकड, उद्योजक नवनाथ धुमाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत अहिल्यानगर येथील कोहिनूर मंगल कार्यालयात पुस्तक प्रकाशन समारंभ नुकताच संपन्न झाला यावेळी मंचावरील मान्यवरांनी कवी शिदोरे यांना पुस्तक प्रकाशनानिमित्त शुभेच्छा दिल्या. आदर्श मोटरमन म्हणून सेवानिवृत्त झाल्यानंतर लिखाणाच्या माध्यमातून समाजसेवा करण्याचा संकल्प केल्याचे शिदोरे यांनी सत्काराला उत्तर देतांना सांगितले.पुस्तक प्रकाशन सोहळ्यानिमित्त याप्रसंगी काव्य संमेलनाचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अनंत कराड, सुभाष सोनवणे, रूपचंद शिदोरे, एकता चे प्रदेश संघटक देवीदास शिंदे, शाहीर भारत गाडेकर, एकता फाउंडेशन पाथर्डी तालुकाध्यक्ष राजेंद्र उदारे, शेवगाव तालुकाध्यक्ष प्रदीप बोडखे, उपाध्यक्ष आत्माराम शेवाळे, डॉ.बेनझीर शेख, भोलानाथ देवकर, सुरेश वैरागकर, गोरख पवार आदी कवी कवयित्रींनी एकसे बढकर एक रचना सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यासर्व संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन एकता फाउंडेशन अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पत्रकार बाळासाहेब कोठुळे यांनी करत कार्यक्रम एका उंचीवर नेऊन ठेवला. यावेळी रूपचंद शिदोरे यांचे कुटुंबीय नातेवाईक, मित्र परिवार आणि एकता फाउंडेशन च्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# समाज सेविका श्रीमती सीमाताई ओस्तवाल पद्मपाणि पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी @ बीड

बीड शहरासह बीड जिल्ह्याचे नाव आपल्या उत्कृष्ट आणि उल्लेखनीय समाज हिताच्या व समाजसेवेच्या माध्यमातून बीड जिल्ह्याचे व बीड शहराचे सर्वत्र महाराष्ट्रामध्ये नावलौकिक करणारे अशा सर्वात बीड जिल्ह्यामध्ये अग्रेसर असलेल्या समाजसेवेच्या माध्यमातून सातत्याने समाजाची सेवा करणाऱ्या अशा उत्कृष्ट आणि कर्तव्यदक्ष लेडी सिंघम समाजसेविका म्हणून ज्यांची ओळख आहे अशा श्रीमती सीमाताई ओस्तवाल यांना बीड येथे संपन्न झालेल्या पद्मपाणि पुरस्काराने या प्रतिष्ठानचे स्मृतिचिन्ह देऊन पद्मपाणि पुरस्काराने सन्मानित करण्यात आले हा कार्यक्रम ४ मे रोजी म्हणजेच रविवारी बीड शहरातील नामांकित असलेले यशवंत नाट्यगृह या ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला या कार्यक्रमाच्या ठिकाणी गेस्ट म्हणून उपस्थित असलेले दैनिक लोकाशाचे मुख्य संपादक विजय राज बंब उत्तम पवार सर सह गेस्ट मान्यवर उपस्थित होते मग बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके साहेब लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब तसेच शिक्षण अधिकारी बोराडे ताई तसेच पद्मपाणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीपजी तरकसे, सिंधू बोराडे, आत्माराम वाव्हल, नितेश उपाध्यक्ष जिल्हा प्रशासनातील इतर विभागातील देखील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते याच पार्श्वभूमीवर ज्यांची समाजसेवेच्या माध्यमातून बीड शहरातील व बीड जिल्ह्यातील नागरिकांना ओळख निर्माण झाली आहे ज्यांनी बीड जिल्ह्यातील बीड शहरातील सर्व नागरिकांच्या मनामध्ये त्यांनी गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या माध्यमातून उत्कृष्ट असे समाज हिताचे कार्य करून एक आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे अशा उत्कृष्ट समाजसेविका म्हणून ज्यांची ओळख बीड जिल्ह्याला आहे आशा श्रीमती सीमाताई ओस्तवाल यांना देखील या कार्यक्रमाच्या ठिकाणी गेस्ट म्हणून उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित केले होते याच पार्श्वभूमीवर त्यांचे कार्य अतिशय उत्कृष्ट आणि अप्रतिम समाजसेवेचे असल्यामुळे त्यांना देखील मान्यवरांच्या हस्ते पद्मपाणि पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले व त्यांच्या पुढील उत्कृष्ट समाजसेवेच्या कार्यासाठी सर्वांच्या वतीने मनस्वी शुभेच्छा देण्यात आल्या सीमाताई ओस्तवाल यांच्या कार्याचा जर विचार केला तर शब्दात व्यक्त करणे देखील शक्य नाही २०१९ लॉकडाऊन कोरोना महामारीच्या लॉकडाऊन च्या काळामध्ये देखील गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या वतीने श्रीमती सीमाताई ओस्तवाल यांनी बीड जिल्ह्यातील प्रत्येक खेड्यापाड्यांमध्ये भेटी देऊन तसेच बीड



शहरांमध्ये प्रत्येक ठिकाणी गोरगरीब लोकांना भेटी देऊन एकंदरीतच कोरोना महामारीच्या काळामध्ये तब्बल सिमा ताई ओस्तवाल यांनी अडीच हजार लोकांना लोकांपर्यंत पोचून किराणा किट धान्य देखील मोठ्या प्रमाणात त्यांनी वाटप केलेले आहे दुष्काळी परिस्थितीमध्ये अठरा हजार लोकांना तीन वेळेच्या जेवणाची देखील व्यवस्था त्यांनी केलेली होती तसेच दुष्काळामध्ये गावागावांमध्ये जाऊन ४५ दिवस मोफत पाणी पुरवठा देखील त्यांनी उपलब्ध करून दिलेला आहे तसेच गोरगरीब लोकांच्या मुलांना देखील शाळेमध्ये गणवेश वाटप करण्याचे कार्य देखील त्यांनी गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या वतीने केलेले आहे तसेच त्यांनी वृक्षारोपण देखील मोठ्या प्रमाणामध्ये बीड शहराच्या ठिकाणी केलेले आहे तसेच बीड शहराच्या आजूबाजूच्या ठिकाणी तसेच बीड तालुक्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण देखील त्यांनी केलेले आहे तसेच नागरिकांचे नेत्र तपासणी नेत्र शिबिर असे बीड शहरामध्ये त्यांनी मोठ्या मोठ्या शिबिराचे देखील त्यांनी आयोजन केलेले आहे या शिबिरामध्ये अनेक लोकांना त्यांनी मोफत नेत्र शस्त्रक्रिया मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून दिलेले आहे अनेक मोफत चष्मे वाटलेले आहेत

# वैभवी देशमुख हिच्या बारावी परीक्षेतील यशाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून अभिनंदन

प्रतिनिधी @ बीड

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हीने अत्यंत कठीण, आव्हानात्मक परिस्थितीला सामोरं जात इयत्ता बारावी परीक्षेत विज्ञान शाखेतून ८५.३३ टक्के गूण मिळविल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तिचे अभिनंदन केले आहे. वैभवीनं मिळविलेल्या यशानं तिच्या अंगभूत गुणांचं, हुशारीचं, धैर्याचं, संयमाचं, जबाबदारीच्या जाणीवेचं दर्शन घडल्याचं सांगून तिच्या यशानं महाराष्ट्राला आनंद झाला आहे, अशा शब्दात त्यांनी तिचं कौतुक केलं आहे.

वैभवी देशमुख हिला पाठविलेल्या अभिनंदनपर पत्रात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे की, इयत्ता बारावी बोर्डाच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. या परीक्षेत विज्ञान शाखेत ८५.३३ टक्के गूण मिळवून तू उत्तीर्ण झाल्याचे समजून माझ्यासह संपूर्ण महाराष्ट्राला आनंद झाला आहे. वडील स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मृत्यूनंतर अत्यंत दु:खद, आव्हानात्मक परिस्थितीला सामोरं जात मिळवलेलं यश तूझ्या अंगभूत गुणांचं, हुशारीचं, धैर्याचं, संयमाचं, जबाबदारीच्या जाणीवेचं दर्शन घडवणारं आहे. तूझ्या यशातून राज्यातील इतर विद्यार्थ्यांना लढण्याची, यशस्वी होण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास आहे. तूझ्या यशानं वडील स्वर्गीय संतोष देशमुख यांना खुप आनंद झाला असता, ते आज आपल्यासोबत नसले तरी तितकाच आनंद महाराष्ट्र आज अनुभवत आहे. तुझ्या कष्टांना, जिद्दीला सलाम. यापुढेही शैक्षणिक कारकिर्दीत, जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर तूला असंच यश मिळत राहो, आम्ही सर्व कायमच तूझ्यासोबत आहोत, असा विश्वास देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



# शासन आणखी किती जणांचे बळी घेणार?

## खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग दुरावस्था; युवा नेते तौफीक पटेल यांचा उद्विग्न सवाल

प्रतिनिधी @ माजलगांव

तालुक्यातून जात असलेल्या खामगाव-पंढरपूर या राष्ट्रीय महामार्ग धारूर रोड, माजलगाव ते लहामेवाडी पर्यंत अक्षरशः मृत्यूचा सापळा निर्माण झाला आहे. या ठिकाणी जवळपास पाच ते सहा जणांचे नाहक बळी गेले आहेत. तर शेकडो जण गंभीर जखमी झाले आहेत. सरकार आणखी किती जणांचे बळी घेणार आहे, असा उद्विग्न सवाल माजलगाव नगर परिषदेचे माजी सभापती तौफीक पटेल यांनी विचारला आहे.


खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग माजलगाव तालुक्यातून जातो. धारूर रोड, माजलगाव ते लहामेवाडी पर्यंत रस्त्याच्या मधोमध मोठमोठ्या भेगा पडलेल्या आहेत. अनेक ठिकाणी रस्त्याला तडे गेलेले आहेत. या प्रकारामुळे मागील काही वर्षांत पाच ते सहा जणांचे बळी गेलेले आहेत. यात नामांकित ॲड.घुबडे आणि अभियंता शेजुळ यांचा समावेश होतो. त्याचबरोबर शेकडो दुचाकीस्वार पडल्याने त्यांना गंभीर दुखापत झालेली आहे. या रस्त्यावरून शेतकरी, विद्यार्थी, कर्मचारी दुचाकीवरून ये-जा करतात. मात्र रस्त्याला पडलेल्या मोठमोठ्या भेंगामुळे दुचाकीस्वार अडकून पडल्याच्या घटना दिवसेंदिवस घडत आहेत. याकडे तौफीक पटेल यांनी शासनाचे लक्ष वेधले. शासन आणखी किती जणांचे बळी घेणार आहेत? असा रास्त सवाल पटेल यांनी व्यक्त केला. धारूर रोड, माजलगाव ते लहामेवाडी पर्यंतच रस्त्याची एवढी दुरावस्था का झाली? याबद्दल शंकाही तौफीक पटेल यांनी व्यक्त केली. या रस्त्याच्या दुरावस्थेला जे जबाबदार आहेत. त्यांची कसून चौकशी करण्याची मागणीही तौफीक पटेल यांनी लावून धरली आहे. रस्त्याची तातडीने डागडुजी करण्यात यावी, जेणेकरून जनसामान्य लोकांना दिलासा मिळेल शासन आणखी किती जणांचा बळी घेणार आहे? असा उद्विग्न सवाल तौफीक पटेल यांनी विचारला आहे.

'रस्त्याच्या दुरावस्थेप्रश्नी नितीन गडकरींना भेटणार'

खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग धारूर रोड, माजलगाव ते लहामेवाडी पर्यंतच्या कामाची तक्रार थेट केंद्रीय व रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे नवी दिल्लीत भेट घेऊन करणार आहे, अशी माहिती माजलगाव नगर परिषदेचे माजी सभापती तौफीक पटेल यांनी दिली. माजलगाव ते लहामेवाडी पर्यंत रस्ता डागडुजीची तातडीने गरज आहे. या मार्गावरील पन्नास गावांचा माजलगावशी थेट संपर्क असतो. अशा ज्वलंत प्रश्नी शासन गाफिल कसे राहू शकते. याकडेही मंत्री गडकरी यांचे लक्ष वेधणार असल्याचेही पटेल यांनी सांगितले.

हजारो नागरिक रास्ता रोकोत सहभागी होणार : पटेल

खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग धारूर रोड, माजलगाव ते लहामेवाडी पर्यंत रस्त्याची झालेली दुरावस्था आणि त्यातून वाढलेले अपघात हा चिंतेचा विषय बनला आहे. याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि पुढील होणारे रस्ते अपघातातील बळी थांबविण्यासाठी हजारोंच्या संख्येने लवकरच या महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करणार असल्याची माहिती तौफीक पटेल यांनी यांनी दिली. या रस्ते आंदोलनात ५० गांवात हजारो दुचाकीस्वार, शेतकरी, नागरिक, विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी होणार आहेत, अशी महितीही तौफीक पटेल यांनी दिली.



# अलीशा शेख मन्सूर १२ वी मध्ये ८०.३३ टक्के घेऊन परीक्षा उत्तीर्ण

बीड /प्रतिनिधी

तालुक्यातील अलीशा शेख मन्सूर इंदिरा गांधी मेमोरियल जूनियर कॉलेज या विद्यार्थीनीने इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश प्राप्त करून ८०.३३ टक्के घेऊन परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# प्रेरणा फाउंडेशन महाराष्ट्र सामाजिक संस्थेचा ७ वा वर्धापन दिन सत्कर्म

## आश्रमात मुलांसाठी मोफत आरोग्य शिबीर व सामाजिक पुरस्कार वितरण सोहळा धुमधडाक्यात साजरा

प्रतिनिधी @ बदलापुर

प्रेरणा फाउंडेशन रजि. ५६४/एफ३८७८४/ बदलापूर/ठाणे/महाराष्ट्र या सामाजिक संस्थेचा ४ मे २०२५ रविवार रोजी प्रेरणा फाउंडेशन ७ वा वर्धापन दिन सोहळा सकाळी १० ते दुपारी ३ वाजता सत्कर्म बालकाश्रम, बदलापूर येथे मोफत आरोग्य शिबीर व पुरस्कार वितरण करून ७ वा वर्धापन दिन धुमधडाक्यात साजरा झाला. मोफत आरोग्य तपासणी तसेच पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन प्रेरणा फाउंडेशन च्या संस्थापिका/अध्यक्षा सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी केले ,यांना बहुमोलाचे सहकार्य सन्माननीय व मा. रामजीत गुप्ता सर, फिजिओथेरपीस्ट डॉ. पारुल लाड महेंद्रू (मोलाचा) वाटा व मा. डॉ.राहत शेख यांनी केले.या कार्यक्रमाला फाउंडेशन चे सचिव वैभव कुलकर्णी, खजिनदार कु. रोहन गावकर, मा.अविनाश म्हात्रे श्री.मंगेश सावंत यांचे विशेष सहकार्य लाभले. व तसेच या सोहळयाला सामाजिक, काम करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. प्रेरणा फाउंडेशन हे एक सामाजिक संस्था असून प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहे. प्रेरणा फाऊंडेशन गेले सहा वर्ष सतत गोर गरीब लोकांना, रस्त्यावरील भटकी लोकांना, अनाथांना आधार देण्याचे काम करते. अनेक आदिवासी पाडे सुधारणे, आदिवासी गावाला रस्ता, वीज, पाणी व लाईट याची सोय, नदया,चौपाटी,एस टी डेपो, रेल्वे स्टेशन,रस्ते,ठिकठिकाणी स्वछता अभियान राबविणे, अनेक अनाथालय, वृद्धाश्रम, अनाथ रस्त्यावरील भटकी मुले यांना सहारा व सहकार्य देण्याचे काम करते. व तसेच प्रेरणा रंगमंच नाट्यमंडळ व प्रेरणा इन्स्टिटयूट अंतर्गत येणारे उपन्न सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी ह्या कॅन्सरग्रस्त,किडनीग्रस्त ई. मतिमंद निराधार लोकांना आधार देण्यासाठी वापरतात.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे मुख्य तपासी अधिकारी मा .श्री.रामजीत (जीतू) गुप्ता, बृह मुंबई होमगार्ड विभाग मा. श्री.दिलीप नारकर, वैद्यकीय तपासणी सहायक अधिकारी धनंजय पवार.अध्यक्ष दीनदयाल कुष्ठरोग संस्था, अध्यक्ष मा. श्री. अविनाश म्हात्रे ,(मुंबई आकाशवाणी केंद्राचे माजी गायक, जितेंद्रि अभिषेकी यांचे शिष्य,प्रसिद्ध गायक), मा. श्री. रघुनाथ फडके, मा.सौ.श्रुती आठल्ये, समाजसेवक,पत्रकार



मा.श्री.राम घरत, फिजिओ थेरपिस्ट मा.डॉ.पारुल लाड महेंद्रू, मा सौं राजकुमारी गुप्ता मा.डॉ.राहत शेख, मा.पी.एस. कदम उपस्थित होते प्रेरणा फाउंडेशन संस्थापिका सौ.प्रेरणा कुलकर्णी व सर्व अतिथीच्या हस्ते पुरस्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला जनजागृती सेवासमिती अध्यक्ष मा श्री.गुरुनाथ तिरपणकर व सत्कर्म आश्रम चे अध्यक्ष नामदेव पेशने व सचिव मकरंद वढवेकर व आश्रम कमिटी यांची उपस्थिती होती सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी व श्री.वैभव कुलकर्णी यांनी सूत्र संचालन निभावले. मा. राजकुमारी गुप्ता मॅडम ,शैलेश सणस सर, मा. हर्षल सर, उर्मिला ताई.,मा सहदेव पाटकर, युवा समाजसेवक मा राम घरत सर,अण्विक्षा कोडापे मॅडम, वंदना ठाकूर मॅडम, मा. संध्या कासारे समाजसेविका, मा ज्योती वाघ ताई

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लोकशाहीचा आत्मा-दत्ता वाकसे

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत

प्रतिनिधी @ बीड

अनेक वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत चार आठवड्यात निर्णय घ्या, असे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने आज महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला दिलेत. तसेच आयोगाच्या २०२२ च्या अहवालापूर्वी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ओबीसी समाजाला आरक्षण देऊन या निवडणुका घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. न्यायालयाने दिलेल्या या निर्णयाचे मल्हार ब्रिग्रेच्या वतीने जिल्ह्यातील तसेच जनतेच्या वतीने आम्ही या निर्णयाचे मनापासून स्वागत करतो अशी प्रतिक्रिया प्रसिद्ध पत्रकाव्दारे मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी दिली आहे. ते पुढे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबवण्याचा प्रकारांना आळा बसेल आणि लोकशाही मूल्यांची गळचेपी होणार नाही असा विश्वास वाटतो. न्यायालयाचाहा निर्णय ऐतिहासिक असून जनतेच्या मताधिकाराचा सन्मान करण्यात आला आहे. स्थानिक स्वराज्य



संस्थांच्या निवडणुका हा भारतीय लोकशाहीचा खऱ्या अर्थाने आत्मा आहे. तळागाळातील लोकांपर्यंत शासकीय मदत मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण काम या संस्थांच्या माध्यमातून होत असते. जनसामान्यांच्या रोजच्या जीवनातील समस्यांची जाणीव असलेले प्रतिनिधी येथे जनतेचे प्रतिनिधित्व करतात. मात्र अनेक वर्षांपासून निवडणूका झाल्या नसल्याने तळागाळातील लोकांच्या अडचणी सोडविण्यात प्रशासन कमी पडत असल्याच्या तक्रारी आहेत. आता या निर्णयाने सर्व सामान्य जनतेला न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. अशा देखील मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी म्हटले आहे

# पंडित जवाहरलाल नेहरु कॉलेजची उज्वल यशाची परंपरा कायम




प्रतिनिधी @ आष्टी

फेब्रुवारी, मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला आहे. आष्टी येथील पंडित जवाहरलाल नेहरू ज्युनियर कॉलेजचा विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ९० टक्के तर एचएससी व्हॉकेशनलचा निकाल ८७ टक्के लागला असून शाखा निहाय गुणानुक्रमे प्रथम, द्धितीय व तृतीय विद्यार्थी पुढील प्रमाणे आहेत. विज्ञान शाखा रायकर तेजस ९१.८३ टक्के, कु. धोंडे अक्षता राजेंद्र ८६.३३टक्के, कु. गोसावी शर्वरी चंद्रकांत ८४.८३ टक्के, कु. धोंडे तनिष्का किरण ८४.८३ टक्के, कला शाखा कु. कोकरे सुवर्णा लक्ष्मण ७० टक्के, पवार अस्मिता युवराज ६९.१७ टक्के, मांडकर रोहन राम ६५ टक्के, एचएससी व्होकेशनल अँटो धस रेखा बलभिम ७३ टक्के प्रथम, अकाउटींग अँण्ड ऑडिटिंग भवर सुनिता भाऊसाहेब ७२ टक्के प्रथम क्रमांक मिळवलेला आहे.

या सर्व यशस्वी विदयार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. आ. भिमरावजी धोंडे साहेब, डॉ. बा. आ. मराठवाडा विदयापीठ सिनेट सदस्य डॉ. अजय दादा धोंडे व प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, माऊली बोडखे, संजय शेंडे, प्राचार्य सुरेश बोडखे, उपप्राचार्य सुनिल भवर व सर्व प्राथ्यापक, प्राध्यापिका व कर्मचारी वर्ग आदिंनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# बीड येथून राशन दुकानातील ३०० क्किंटल तांदूळ काळया बाजारात जाताना पकडलेला गुन्हा हायकोर्ट मध्ये रद्द. ड. श्रीकांत कवडे

प्रतिनिधी @ बीड

अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांना मिळालेल्या गुप्त माहिती द्वारे बीड येथून निघालेला आणि कॅन्टोन्मेंट येथे पकडण्यात आलेला सोळा चाकी ट्रक मध्ये मिळून आलेल्या तीनशे क्किंटल तांदूळ जप्त करून महेश गृह उद्योग बीड यांचे मालक प्रकाश तोतला व त्यांच्या मुलावरील गुन्हा व दोषारोप पत्र माननीय हायकोर्ट औरंगाबाद मध्ये रद्द करण्यात आले .

प्रकरणाची सविस्तर हकीकत अशी की अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांना क्राईम ब्रँच यांच्याकडून अशी गुप्त माहिती मिळाली की बीड येथून एक सोळा चाकी ट्रक हा राशन दुकानातील तांदूळ घेऊन काळया बाजारात विकण्यासाठी पनवेल येथे जात आहे या माहितीवरून अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांनी सापळा रुचून सदरील ट्रक हा कॅन्टोन्मेंट येथे पकडला व तपासणी केली असता सदरील ट्रक मध्ये सहाशे गोण्या तांदूळ असे एकूण ३०० क्किंटल मिळून आला सदरील तांदळाची माहिती ड्रायव्हरला विचारले असता त्याने सांगितले की सदरील तांदूळ हा महेश गृह उद्योग बीड यांचे मालक प्रकाशजी तोतला यांनी राशन दुकानातील तांदूळ घेऊन प्रोसेस करून सदर तांदूळ हा काळया बाजारात विकण्यासाठी पनवेल येथे नवाकार उद्योग येथे पाठवलेला आहे त्याचबरोबर सदरील तांदळाचे पावतीची मागणी केली असता ती ड्रायव्हर कडे मिळून न आल्यामुळे अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांनी प्रकाश तोतला व त्यांचा मुलगा व ड्रायव्हर व इतर एक जनावर जीवनावश्यक वस्तू कायद्याचे अधिनियम तीन व सात नुसार गुन्हा दाखल केला होता .

सदरील गुन्हा रद्द करण्यासाठी प्रकाश तोतला व त्यांचे मुलगा यांनी एडवोकेट श्रीकांत जी कवडे यांच्यामार्फत माननीय हायकोर्ट औरंगाबाद येथे फौजदारी अर्ज दाखल केला होता सदरील फौजदारी अर्जावर सुनावणी होताना श्री तोतला यांचे वकील कवडे यांनी असे नमूद केले की पोलिसांनी चुकीच्या माहितीच्या आधारे गुन्हा दाखल केलेला आहे सदरील तांदूळ हा काळया बाजारात जात आहे तसेच सदरील तांदूळ हा राशन दुकानाचा आहे याचा कुठलाही पुरावा पोलीस गुन्ह्यामध्ये तसेच दोषारोप पत्रामध्ये सिद्ध करू शकलेले नाहीत व चौकशी अंती त्यांच्याकडे कुठलाही पुरावा दिसून येत नाही हा युक्तिवाद ग्राह्य धरून माननीय हायकोर्टाने श्री प्रकाश तोतला व पवन तोतला बीड यांच्यावरील अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन येथे दाखल असलेला गुन्हा तसेच दोषारोपपत्र आरोपीचे वकील ड .श्रीकांत. जी .कवडे यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून मा. न्यायालयाने रद्द केले सदर प्रकरणाकडे सर्व मराठवाड्याचे लक्ष लागलेले होते त्यामुळे ड. श्रीकांत कवडे यांचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.